RNI NO. MAHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ७ वे, अंक नं. : ३५

दि. २६ मे २०२६, वार : मंगळवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रू.

दैनिक

# महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

संपादक : अशोक हनवते, मो. 9421094991, 7264079990

## जम्मू-काश्मीरमध्ये दारुल उलूम जमातच्या माजी प्रमुखाच्या घरावर एनआयएचा छापा

**श्रीनगर** : राष्ट्रीय तपास यंत्रणेनं सोमवारी दक्षिण काश्मीरच्या शोपियान जिल्ह्यातील झैनापोरा भागातील मुलू चित्रगाम येथील रहिवासी शहजादा औरंगजेब याच्या घरासह अनेक ठिकाणी छापे टाकले. सूत्रांनुसार, शहजादा औरंगजेब यानं यापूर्वी शोपियानमध्ये जमात-ए-इस्लामीचं (वद्द) जिल्हाप्रमुख म्हणून काम केलं होतं.

काही तास शोधमोहीम राबवली : अधिकाऱ्यांनी सांगितलं की, एनआयएचे पथक पोलीस आणि सीआरपीएफच्या जवानांसह पहाटे लवकर शहजादा औरंगजेब याच्या घरी पोहोचले आणि त्यांनी काही तास शोधमोहीम राबवली. शोधमोहिमेदरम्यान काही वस्तू जप्त करण्यात आल्या आहेत की नाही, याबाबत तपास यंत्रणेकडून तत्काळ कोणतंही अधिकृत निवेदन आलं नाही. तसंच याबाबत अद्याप कोणालाही ताब्यात घेण्यात आल्याचं किंवा अटक करण्यात आल्याचं वृत्त समोर आलं नाही.

संघटनेवर सरकारनं घातली होती बंदी : जमात-ए-इस्लामी जम्मू आणि काश्मीरवर सुरू असलेल्या कारवाईच्या पार्श्वभूमीवर ही शोधमोहीम राबवली जात आहे. या संघटनेवर भारत सरकारनं २०१९ मध्ये बेकायदेशीर कृत्ये (प्रतिबंध) कायद्या (ळअइअ) अंतर्गत बंदी घातली होती. फुटीरतावादी कारवाया आणि दहशतवादाला निधी पुरवल्याच्या आरोपांमुळं ही बंदी नंतर २०२४ पर्यत वाढवण्यात आली होती. यादरम्यान, एनआयएनं शोपियान जिल्ह्यातील इमाम साहिब भागातील जामिया सिराज-उल-उलूम इथंही शोधमोहीम राबवली. जम्मू आणि काश्मीर प्रशासनानं अलीकडेच बेकायदेशीर कृत्ये (प्रतिबंध) कायद्याच्या (यूएपीए) कलम ८(१) अंतर्गत या संघटनेला बेकायदेशीर संघटना म्हणून घोषित केलं आहे.

## मुंबई आग्रा महामार्गावरील लळींग घाटामध्ये तिहेरी अपघात : ६ प्रवाशांचा मृत्यू तर २६ जखमी

**धुळे/प्रतिनिधी** : लळींग घाट परिसरात पहाटेच्या सुमारास भीषण तिहेरी अपघात घडला. या दुर्घटनेत ६ जणांचा जागीच मृत्यू झाला असून तब्बल २६ जण जखमी झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सुरुवातीला रेतीनं भरलेला डंपर आणि ट्रक यांच्यात जोरदार धडक झाली. अपघातानंतर टोल कर्मचारी व पेट्रोलिंग पथक घटनास्थळी पोहोचून जखमींना बाहेर काढण्याचं काम करत होते. दरम्यान, भरधाव वेगानं येणाऱ्या ट्रॅव्हल्स बसनं अपघातग्रस्त ट्रक आणि डंपरला जोरदार धडक दिली. या भीषण धडकेत ट्रॅव्हल्सच्या केबिनमध्ये बसलेल्या काही जणांचा जागीच मृत्यू झाला.

अपघातात गंभीर जखमी झालेल्या २० ते २२ जणांना तातडीनं धुळे जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलं आहे. घटनास्थळी पोलीस व प्रशासनाकडून मदतकार्य सुरू असून अपघातामुळे काही काळ वाहतूक विस्कळीत झाली. अपघाताचं नेमकं कारण अद्याप स्पष्ट झालं नसून पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे. अपघातात गंभीर जखमी झालेल्या २० ते २२ जणांना तातडीनं धुळे जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलं आहे.

## आधी जावई-व्याहीसह मोदींची भेट, नंतर इंधन दरवाढीवरून घेरले; सुप्रिया सुळेंनी नेमकी काय टीका केली?

**मुंबई/प्रतिनिधी** : बारामती लोकसभा मतदारसंघाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी नुकतीच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेऊन लेक रेवती सुळेच्या लग्नाचं आमंत्रण दिलं. यावेळी त्यांच्याबरोबर त्यांचे व्याही अरुण लखानी आणि जावई सारंग लखानीही उपस्थित होते. या भेटीनंतर सुप्रिया सुळेंनी आता थेट केंद्र सरकारवर तोफ डागली आहे. वाढत्या इंधन दरवाढीवरून सुप्रिया सुळेंनी टीका केली असून देशात संघर्ष सुरू असून अडचणीचा काळ सुरू झाला असल्याचं त्यांनी म्हटलंय. त्यांनी आज मुंबईत पत्रकारांशी संवाद साधला.

गेल्या ११ दिवसांत देशभरात तीनवेळा पेट्रोल-डिझेलच्या किमती वाढल्या आहेत. अमेरिका-इराण युद्धाचा भडका उडालेला असताना भारतावर त्याचे गंभीर परिणाम दिसायला सुरुवात झाली आहे. यावरून सुप्रिया सुळे यांनी केंद्र सरकावर टीका केली. आम्ही सातत्याने याविषयी बोलत होते, राहुल गांधी, इंडिया आघाडीने यावर संसदेत सातत्याने आवाज उठवला, असं त्या म्हणाल्या.

त्या पुढे म्हणाल्या, पेट्रोल-डिझेलसाठी सामान्य माणसं रांगेत उभे आहेत. शेतकऱ्यांचीही अवस्था झाली आहे. मंत्री म्हणतात युरिआ मिळणार नाही, मग हे प्रश्न सुटणार कसे? कशाचंही सोंग घेता येतं. पण पैसे आणि अन्नधान्याचं सोंग घेता येत नाही. तसंच राष्ट्रीय संकट उभं राहिलं असल्याचंही त्यांनी स्पष्ट केलं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि छगन भुजबळ यांची विरोधाभास वक्तव्य आहेत. देवेंद्र फडणवीस म्हणतात की देशात पुरेसा साठा आहे, पण छगन भुजबळ म्हणतायत की ३० दिवसांचाच साठा आहे. मग या सरकारने काय नियोजन केलंय? केंद्र सरकारमध्ये राहुल गांधी वारंवार सांगत आहेत. त्याबाबतीत खरं का बोलत नाहीय सरकार? असाही प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

# प्रेम चोपड़ा यांना राष्ट्रपती अवार्ड देण्याची शासनाला के. रवि (दादां) ची विनंती



**मुंबई / के एच हनवते :** आजच्या धावपळीच्या आणि चमकधमकीच्या जगात माणुसकी हरवत चालली आहे, असे अनेकदा म्हटले जाते. विशेषतः चित्रपटसृष्टीत, जिथे यश, प्रसिद्धी आणि व्यस्तता यांच्यामध्ये मानवी भावना कधी कधी मागे पडतात. मात्र अशा वातावरणातही काही व्यक्ती आपल्या कृतीतून संवेदनशीलतेचा आणि माणुसकीचा जिवंत आदर्श समाजासमोर ठेवतात. अशीच एक भावनिक आणि प्रेरणादायी भेट नुकतीच घडली ज्यामध्ये सामाजिक कार्यकर्ते व जनसंपर्क क्षेत्रातील सक्रिय व्यक्तिमत्त्व के . रवि ( दादा ) यांनी ज्येष्ठ अभिनेते यांची प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांच्या तब्येतीची विचारपूस केली.

''प्रेम नाम है मेरा प्रेम चोपडा'' हा डायलॉग आजही भारतीय चित्रपटसृष्टीतील एक अजरामर ओळख मानली जाते . अनेक दशकांपासून आपल्या अभिनयाने प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारे प्रेम चोपडा यांनी खलनायकाच्या भूमिका करताना देखील आपल्या वेगळ्या शैलीने चाहत्यांचे प्रेम मिळवले. पण काळाच्या ओघात वय वाढले, तब्येत खालावली आणि एकेकाळी ज्यांच्या घराबाहेर गर्दी असायची, त्या कलाकाराच्या आयुष्यात एकटेपणाची सावली दिसू लागली.

विशेष बाब म्हणजे, ज्येष्ठ कलाकारांची विचारपूस करणे, त्यांच्या अनुभवांचा सन्मान करणे आणि त्यांच्या मानसिक आधारासाठी वेळ देणे ही केवळ औपचारिकता नसून सांस्कृतिक जबाबदारी आहे. अशा वेळी के . रवि ( दादा ) यांनी आपले जवळचे मित्र गायक. संदिप कुमार सह पुढाकार घेत प्रेम चोपडा यांची प्रत्यक्ष भेट घेतली आणि त्यांच्या आरोग्याची, मानसिक स्थितीची आणि आयुष्याबद्दलच्या भावना समजून घेतल्या.

ही भेट फक्त ''भेट'' नव्हती, तर एका विशिष्ट कलाकाराला पुन्हा जगण्याची उमेद देणारा मानवी संवाद होता. चर्चेदरम्यान बॉलीवूडमधील बदलते वातावरण, नवीन पिढी, सिनेमा आणि समाज यावर मनमोकळ्या गप्पा झाल्या. जुन्या आठवणी, अभिनयातील अनुभव आणि आजच्या काळातील चित्रपटसृष्टीतील बदल यांवर चर्चा करताना प्रेम चोपडा भावूक झाल्याचेही समोर आले.

यावेळी के . रवि ( दादा ) यांनी सध्या तयार होत असलेल्या '' रेवती या शॉर्ट फिल्मविषयी माहिती दिली. या चित्रपटाचा आशय, सामाजिक संदेश आणि नव्या पिढीला प्रेरणा देणारी भूमिका याबद्दल सांगताना त्यांनी प्रेम चोपडा यांना या प्रकल्पाशी भावनिकरित्या जोडण्याचा प्रयत्न केला. विशेष म्हणजे, ''तुमचा अनुभव आणि तुमचे आयुष्य आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी आहे,'' असे सांगत त्यांनी प्रेम चोपडा यांच्यामध्ये पुन्हा सकारात्मक ऊर्जा निर्माण केली. आणि प्रेम चोपड़ा यांना. राष्ट्रपति अवार्ड देण्याची शासनाला के. रवि ( दादां ) ची विनंती ही पूढे आली.

कधी कधी औषधांपेक्षा शब्द मोठे काम करतात. एखाद्या आजारी व्यक्तीला ''तुम्ही महत्त्वाचे आहात'', ''लोकांसहित आम्ही अजूनही तुमच्यावर प्रेम करतो '', ''तुमचे अनुभव समाजाला आवश्यक आहेत'' हे जाणवून देणे म्हणजेच त्याला नव्याने जगण्याची प्रेरणा देणे होय. के . रवि ( दादा ) यांनी नेमके हेच काम केले.

आज समाजात प्रसिद्ध व्यक्तींना त्यांच्या यशाच्या काळात सर्वजण सलाम करतात; पण त्यांच्या कठीण काळात साथ देणारे फार कमी असतात. ही भेट त्या अर्थाने अत्यंत महत्त्वाची ठरते. कारण ती आपल्याला शिकवते की, माणूस मोठा त्याच्या प्रसिद्धीमुळे नाही तर त्याच्या संवेदनशीलतेमुळे होतो.

प्रेम चोपडा यांच्यासारख्या ज्येष्ठ कलाकारांनी भारतीय सिनेमाला जे योगदान दिले आहे, त्याचा सन्मान केवळ पुरस्कारांनी होत नाही; तर त्यांच्या आयुष्याच्या उत्तरार्धात त्यांच्याशी संवाद साधून, त्यांना आधार देऊन आणि त्यांना समाजाशी जोडून ठेवून होतो. के . रवि ( दादा ) यांनी घेतलेली ही भेट त्या मूल्यांची जाणीव करून देणारी ठरली आहे.

आज सोशल मीडियावर फोटो टाकणे, प्रसिद्धी मिळवणे किंवा चर्चेत राहणे सोपे झाले आहे; पण एखाद्याच्या आयुष्यात आशेचा किरण निर्माण करणे हे खरे कार्य असते. प्रेम चोपडा यांना दिलेली ही भावनिक साथ आणि सकारात्मक संवाद हे फक्त एक प्रसंग नसून, ''माणुसकी अजून जिवंत आहे'' याचा सुंदर संदेश आहे.

ही घटना बॉलीवूडसाठीही एक आरसा आहे. ज्येष्ठ कलाकार हे केवळ इतिहास नसतात, तर ते प्रेरणेचे विद्यापीठ असतात. त्यांचा सन्मान, त्यांची काळजी आणि त्यांच्याशी जपलेले नाते हेच खऱ्या संस्कृतीचे लक्षण आहे.

के . रवि ( दादा ) यांच्या या उपक्रमामुळे एक महत्त्वाचा संदेश समाजासमोर आला आहे कधी कधी एखाद्या व्यक्तीला जगण्यासाठी मोठ्या संपत्तीची गरज नसते; फक्त कोणीतरी आपुलकीने विचारपूस करणारा माणूस पुरेसा असतो.

## लातूरचे माजी आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांची डीएओ पदावर नियुक्ती; धाडसी प्रशासनशैलीची पुन्हा चर्चा

**लातूर/प्रतिनिधी** : लातूर शहर महानगरपालिकेचे माजी आयुक्त तथा प्रशासक बाबासाहेब मनोहरे यांची राज्य शासनाच्या नगरविकास विभागाने हिंगोली जिल्हाधिकारी कार्यालयांतर्गत जिल्हा प्रशासन अधिकारी (डीएओ) पदावर नियुक्ती केली आहे. त्यांनी नव्या पदाचा कार्यभार स्वीकारल्याची माहिती मिळाली आहे. त्यांच्या पुनरागमनामुळे लातूरमध्ये पुन्हा एकदा त्यांच्या धाडसी आणि कर्तव्यनिष्ठ प्रशासनशैलीची चर्चा सुरू झाली आहे.



बाबासाहेब मनोहरे यांनी २१ ऑक्टोबर २०२२ ते ९ एप्रिल २०२५ या कालावधीत लातूर महानगरपालिकेचे आयुक्त व प्रशासक म्हणून काम पाहिले. त्यांच्या कार्यकाळात महापालिकेच्या आर्थिक शिस्तीवर विशेष भर देण्यात आला.

कर वसुलीत विक्रमी वाढ, विकासकामांसाठी मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून देणे, कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीचे प्रश्न मार्गी लावणे आणि प्रशासनातील कामकाज गतिमान करणे यासाठी त्यांची विशेष ओळख निर्माण झाली होती.

मनोहरे यांनी अनेक गोरगरीब नागरिकांना न्याय देण्याचे काम केले. सामान्य नागरिकांच्या तक्रारींवर तत्काळ निर्णय घेणे, नियमबाह्य कामांवर कठोर कारवाई करणे आणि महापालिकेच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य देणे ही त्यांची कार्यशैली होती. त्यामुळे प्रशासनात शिस्त निर्माण झाली होती. त्यांच्या कार्यकाळात अनेक लोकप्रतिनिधीदेखील महापालिकेत येताना सावध राहत होते, एवढी त्यांची प्रशासनावर पकड आणि निर्णयक्षमता असल्याची चर्चा त्या काळात होत होती.

५ एप्रिल २०२५ रोजी त्यांच्या प्रकृतीसंदर्भात गंभीर घटना घडली होती. त्यानंतर त्यांच्यावर तातडीने उपचार करण्यात आले. लातूरचे सुप्रसिद्ध डॉ. हनुमंत किनीकर यांच्यासह अनेक डॉक्टरांनी त्यांच्यावर उपचार केले. दीर्घकाळ प्रकृती चिंताजनक असतानाही त्यांनी जिद्दीने परिस्थितीवर मात केली. त्यामुळे अनेकांना आश्चर्याचा धक्का बसला होता, कारण ते पुन्हा इतक्या लवकर सेवेत रुजू होतील असे फार कमी लोकांना वाटत होते. आता प्रकृतीत सुधारणा झाल्यानंतर राज्य शासनाने त्यांच्यावर पुन्हा प्रशासकीय जबाबदारी सोपवली आहे. त्यांच्या नव्या नियुक्तीमुळे प्रशासनात अनुभवी, कठोर आणि लोकहिताला प्राधान्य देणाऱ्या अधिकाऱ्याचे पुनरागमन झाल्याची भावना व्यक्त होत आहे.

## लातूरच्या बालरंगभूमी परिषदेला सन्मान कर्तृत्वाचा राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान

### लायन्स क्लब ऑफ लातूर सिटीने केला सन्मान



**लातूर/प्रतिनिधी** : लायन्स क्लब ऑफ लातूर सिटीच्या वतीने आयोजित करण्यात आलेला 'सन्मान कर्तृत्वाचा' हा राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा दयानंद सांस्कृतिक सभागृहात मोठ्या उत्साहात आणि रसिकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादात संपन्न झाला.

लातूरच्या सांस्कृतिक जडणघडणीमध्ये लातूरच्या बालरंगभूमी परिषदेचे मोलाचे योगदान आहे. बालकांसाठी विविध उपक्रम या परिषदेच्या माध्यमातून सातत्याने राबवले जातात. हिच बाब लक्षात घेऊन लायन्स क्लब ऑफ लातूर सिटीच्या वतीने बालरंगभूमी परिषदेला ''सन्मान कर्तृत्वाचा'' या अत्यंत मानाच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

व्यासपीठावर उपस्थित लातूरचे जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड, पोलीस अधीक्षक अमोल तांबे, न्यूज १८ मराठी वृत्त वाहिनीचे सहसंपादक विलास बडे, लायन्स क्लबचे अध्यक्ष नागनाथ गित्ते, संयोजक अनिल पुरी यामान्यवरांच्या हस्ते हा पुरस्कार बालरंगभूमी परिषद, लातूरचे अध्यक्ष रणजित आचार्य यांच्यासह कोषाध्यक्ष रवि अघाव, कार्यकारिणी सदस्य वनिता गोजमगुंडे, सुमती बिडवे-सोमवंशी, तेजश्री घवले, वसुधा पाटिल, विशाल वाटवडे, महेश बिडवे, महेश पवार यांनी स्विकारला. सदरील राज्यस्तरीय पुरस्कार मिळाल्याबद्दल बालरंगभूमी परिषदेच्या राज्य अध्यक्षा ॲड. निलम शिर्के-सामंत, राज्य उपाध्यक्ष ॲड. शैलेश गोजमगुंडे यांच्यासह बालनाट्य क्षेत्रातील अनेकांनी त्यांचे अभिनंदन केले.

# लातूर पॅटर्न बदनाम करण्याचे षड्यंत्र; उद्योग विभागाच्या तुघलकी नोटिसीची होळी करत काँग्रेस व कृती समितीचा एल्गार!

**लातूर/प्रतिनिधी** : नीट पेपर फुटी प्रकरणाच्या नावाखाली संपूर्ण महाराष्ट्रात नावलौकिक असलेल्या लातूर पॅटर्नला जाणीवपूर्वक टार्गेट केले जात असल्याचा आरोप करत आज लातूरमध्ये प्रचंड संताप व्यक्त करण्यात आला. लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटी, लातूर जिल्हा काँग्रेस कमिटी आणि लातूर पॅटर्न बचाव कृती समिती यांच्या वतीने आज लातूर अर्बन बँक उद्योग भवन समोर प्रशासनाच्या जाचक नोटिसीचे जाहीर दहन करून तीव्र निषेध आंदोलन करण्यात आले. या वेळी आंदोलकांनी ''लातूरच्या शैक्षणिक अस्मितेशी खेळ खपवून घेतला जाणार नाही,'' असा थेट इशारा प्रशासनाला दिला.

लातूर येथील जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक निखिल पाटील यांनी २२ मे २०२६ रोजी एक वादग्रस्त नोटीस (जा.क्र.जिउकेला/सऔव/२०२६/८२१) जारी केली आहे. या आदेशान्वये, लातूर इंडस्ट्रियल इस्टेट (औद्योगिक वसाहत) मधील मूळ कराराचा भंग करून उत्पादन व्यतिरिक्त सुरू असलेले सर्व पूरक व्यवसाय, जसे की ट्यूशन क्लासेस, कोचिंग क्लासेस, शिकवणी वर्ग, हॉस्टेल, खानावळ, वस्तीगृह आणि अभ्यासिका हे तातडीने आणि सरसकट बंद करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या फर्मानामुळे लातूरच्या ट्यूशन एरियात शिकणाऱ्या हजारो विद्यार्थ्यांमध्ये आणि पालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

आमचे टॅलेंट जुने आहे, म्हणून लातूर पॅटर्न बावन्नकशी सोने आहे!

यावेळी लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अभय साळुंके यांनी माध्यम प्रतिनिधींशी बोलताना प्रशासकीय कारवाईवर आणि भाजपवर घणाघाती आरोप केले.

ते म्हणाले मोठ्या कष्टाने आणि अनेकांच्या बलिदानातून लातूर पॅटर्नचे हे बावन्नकशी सोने उभे राहिले आहे. हा पॅटर्न कोणाच्या उपकाराने नाही, तर जनमानसात रुजलेला आहे. आमचे टॅलेंट जुने आणि सिद्ध झालेले आहे, त्यामुळे ते कोणालाही बदनाम करता येणार नाही. या नीट पेपर फुटी प्रकरणाच्या आड लातूर पॅटर्नला बदनाम करण्याचे मोठे षड्यंत्र रचले जात आहे.

यावेळी अभय साळुंके यांनी संताप व्यक्त करताना सांगितले की, ''येत्या २१ जून रोजी विद्यार्थ्यांची महत्त्वाची परीक्षा आहे. आधीच विद्यार्थी आणि पालक प्रचंड मानसिक तणावाखाली आहेत.अशा ऐन परीक्षेच्या काळात तुम्ही थेट क्लासेस, हॉस्टेल्स आणि अभ्यासिका बंद करण्याचे आदेश काढून



विद्यार्थ्यांना वाऱ्यावर सोडत आहात का? केवळ राजकीय आकसापोटी आणि कोणाच्या तरी सांगण्यावरून प्रशासनाने झोपेतून उठल्यासारखा हा तुघलकी अध्यादेश कसा काढला? इथे कायद्याचे राज्य आहे की हुकूमशाही?'' असा सवालही आंदोलकांनी केला.

अशाच प्रकारच्या अटक आणि गैरप्रकार पुण्यातही समोर आले आहेत. पण पुण्यात घटना घडली की ती त्या पर्टिक्युलर प्राध्यापकाची किंवा शिक्षकाची चूक ठरते. मात्र लातूरमध्ये काही झाले की थेट संपूर्ण लातूर पॅटर्नच चुकीचा, असा प्रचार केला जातो. हा दुजाभाव आणि मग्रुरी आम्ही कदापि सहन करणार नाही.''

कृती समितीने स्पष्ट केले की, ते कोणत्याही गुन्हेगाराच्या पाठीशी उभे राहिलेले नाहीत. त्यांची भूमिका स्पष्ट करताना ते म्हणाले: ''नीट पेपर फुटी प्रकरणात जे कोणी दोषी आढळतील, मग ते डॉक्टर असोत, मोटेगावकर असोत किंवा पी. व्ही. कुलकर्णी असोत; चौकशीअंती ते दोषी सिद्ध झाल्यास त्यांना भरचौकात फाशी द्या! २३ लाख विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळणाऱ्या एकालाही सोडू नका, आमचा त्याला पाठिंबाच असेल. परंतु, याच्या आडून ६३ च्या ६३ प्लॉट धारकांना सरसकट नोटीस देणे चुकीचे आहे. प्रशासनाने प्रत्येकाला वैयक्तिक सुनावणीची संधी द्यावी, त्यांची केस समजून घ्यावी आणि मगच कायदेशीर कारवाई करावी. असा हुकूमशाही पद्धतीने ट्यूशन एरिया बंद पाडण्याचा प्रयत्न झाल्यास तीव्र संघर्ष केला जाईल.''

### अन् आंदोलकांनी पेटवून दिली नोटीस...

उद्योग भवन परिसरात जमा झालेल्या शेकडो आंदोलकांनी आणि काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. प्रशासनाचा निषेध नोंदवण्यासाठी आंदोलकांनी अधिकृत पत्राच्या प्रतींची होळी केली. या आंदोलनामुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. आंदोलनात लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष प्रा.डॉ. शिवाजी जवळगेकर, उपमहापौर स्नेहल उटगे,ॲड. किरण जाधव, विष्णुदास धायगुडे, प्रवीण सूर्यवंशी, कैलास कांबळे, प्रवीण कांबळे,विजय जाधव, विकास कदम,संतोष शिंदे,पवार सर,पाटील कदम,मिरकले सर,पी. व्ही. विवेकानंद,संतोष धायगुडे ,चंद्रकांत बिडवे,बाळासाहेब कदम,पी. एस. जाधव तसेच लातूरमधील शिक्षण क्षेत्रातील अनेक मान्यवर, विद्यार्थी, पालक आणि काँग्रेसचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संपादकीय...

## अमेरिकेचे निमंत्रण लबाडाचं आवतण ठरू नये

अमेरिका, जपान, ऑस्ट्रेलिया आणि भारत या चार देशांनी स्थापन केलेल्या 'क्वाड' या संघटनेच्या परराष्ट्र मंत्र्यांच्या बैठकीनिमित्त अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबिओ यांचा भारत दौरा झाला. त्यातून भारत-अमेरिका संबंधांतील तणाव दूर करण्याचा प्रयत्न रुबिओ यांनी केला असला तरी भारताच्या दृष्टीने 'सावध ऐका, पुढील हाका' ही स्थिती टळलेली नाही. रुबिओ हे अमेरिकेचे ७२ वे परराष्ट्र मंत्री आणि प्रभारी राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार आहेत. त्यांच्याकडे प्रचंड अधिकार आहेत. इस्रायल-इराण मध्यस्थीसारखे संवेदनशील विषय ते हाताळत आहेत. परदेशी परराष्ट्र मंत्री प्रथम समकक्षांशी चर्चा करतात आणि नंतर पंतप्रधानांना भेटतात. मात्र, रुबिओ यांच्या बाबतीत हा शिष्टाचार बाजूला ठेवला गेला. त्यांनी पंतप्रधान मोदींना अमेरिका भेटीचे निमंत्रण दिले. यावरून अमेरिका भारताला विशेष महत्त्व देत असल्याचे दाखवण्याचा प्रयत्न दिसतो. भारताला महत्त्वाचा धोरणात्मक भागीदार म्हणतानाच रुबिओ यांनी सद्य:स्थिती विचारात घेत अमेरिकेकडून मोठ्या प्रमाणावर ऊर्जा पुरवठा करण्याची तयारी दर्शवली. भारतात इंधन टंचाई असताना रुबिओंचा हा प्रस्ताव आश्वासक आणि दिलासादायक वाटू शकतो. पण अमेरिकन तेलाचे अर्थकारण वेगळे असून काही मुद्दे प्रश्नांकित आहेत. रशिया आणि इराण भारताला सवलतीत तेल देतात. अमेरिकाही त्या दरातच कच्चे तेल देईल का, हा कळीचा मुद्दा आहे. भारत कच्च्या तेलाच्या आयातीवर तब्बल १७४ अब्ज डॉलर्स खर्च करतो. युक्रेन संघर्षानंतर रशिया भारताला आंतरराष्ट्रीय बाजारभावापेक्षा खूपच स्वस्त दरात कच्चे तेल देत आहे. याउलट अमेरिकन तेल हे ब-ेंट किंवा डब्ल्यूटीआय या जागतिक मानकांनुसार बाजारातील चालू दराने विकले जाते. यात कोणतीही विशेष सवलत मिळत नाही. जागतिक स्तरावर तेल १०० डॉलर्सच्या पार असते, तेव्हा रशियन तेलामुळे भारताची अब्जावधी डॉलर्सची बचत होते. अमेरिकन तेलामुळे ती शक्य नाही. कच्च्या तेलाचे व्यवहार अमेरिकन डॉलरमध्ये होतात. भारतीय रुपया डॉलरच्या तुलनेत ऐतिहासिक नीचांकी पातळीवर पोहोचला आहे. त्यामुळे भारताला तेल आयातीसाठी आधीच जास्त पैसे मोजावे लागत आहेत. अशा स्थितीत महागडे अमेरिकन तेल खरेदी केले, तर आयात बिल कमालीचे वाढेल. पर्यायाने चालू खात्यातील तूट वाढून अर्थव्यवस्थेवर आणि देशांतर्गत महागाईवर अत्यंत विपरीत परिणाम होईल. रशियाच्या तुलनेत अमेरिकेतून भारतात तेल आणण्याचा सागरी वाहतूक खर्चही अधिक आहे. अमेरिकेने व्हेनेझुएलावरील निर्बंध तात्पुरते शिथिल केल्यानंतर भारताने तिथून मोठ्या प्रमाणावर हेवी क्रूडची आयात सुरू केली. व्हेनेझुएला आता सौदी अरेबिया आणि अमेरिकेला मागे टाकून भारताचा तिसरा मोठा तेल पुरवठादार देश बनला आहे. व्हेनेझुएलाकडून होणारी तेल आयात सुरू राहण्यास ट्रम्प यांची हरकत नसावी. पण त्याऐवजी अमेरिकेकडून तेलाचा हट्ट धरल्यास भारतासाठी ते गैरसोयीचे ठरणार आहे. भारताचे ऊर्जा धोरण हे पश्चिम आशिया आणि रशिया संबंधांच्या भक्कम पायावर आधारलेले आहे. या देशांशी आपली मैत्री काळाच्या कसोटीवर उतरली आहे. अमेरिकेसोबतचा व्यापार कमी झाल्याने भारताच्या निर्यातीला आणि निर्यातदारांना फटका बसला. पण त्याची किंमत या मैत्री संबंधांकडे पाठ फिरवून मोजता येणार नाही. भारत-अमेरिका यांच्यातील व्यापार तूट कमी करण्यासाठी ट्रम्प यांनी याआधीही अमेरिकेकडून तेल खरेदीचा मुद्दा मांडला होता. रुबिओ तीच भूमिका पुढे नेत आहेत. रुबिओ यांनी रखडलेला द्विपक्षीय करार लवकरच मूर्त रूप घेईल, असे संकेत दिले. ते देताना भारत पुढील पाच वर्षांत ५०० अब्ज डॉलर्सची अमेरिकन उत्पादने खरेदी करेल, या ट्रम्प यांच्या विधानाचा पुनरुच्चार केला. यावरून अमेरिका व्यापार कराराबाबत स्वतःच्या मतावर ठाम दिसते. रुबिओ यांनी या कराराबाबत अमेरिका लवचिकता दाखवेल, असे कुठेही म्हटलेले नाही. अमेरिकेची सध्याची धोरणे भारतीय हिताच्या दृष्टीने अनुकूल नसल्यामुळेच कराराला विलंब होत आहे. ट्रम्प हे जागतिक पातळीवर पाकिस्तानला प्रचंड महत्त्व देतात. ही भूमिका भारतासाठी चिंतेची आहे. दहशतवाद ते द्विपक्षीय व्यापारापर्यंत, अमेरिकेच्या धोरणांमध्ये कमालीची अस्थिरता आहे. भारताला महान भागीदार म्हणताना व्यापारी, संरक्षण आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील सहकार्य वाढवण्यासाठी अमेरिकेला ठोस पावले उचलावी लागतील. हिंद-प्रशांत क्षेत्रातील स्थैर्यासाठी आणि क्वाडच्या भवितव्यासाठी अमेरिका किती गांभीर्य दाखवतो, यावरच या दौर्‍याचे यश अवलंबून असेल. ट्रम्प प्रशासनाने नुकतेच 'अमेरिका फर्स्ट' व्हिसा टूल आणि ग्रीन कार्डच्या नियमांत मोठे बदल केले. अमेरिकेत जाणार्‍या किंवा तिथे कार्यरत आयटी क्षेत्रातील व्यावसायिक आणि विद्यार्थ्यांना यामुळे अडचणींचा सामना करावा लागू शकतो. या जाचक अटी शिथिल कराव्यात, अशी भारताची मागणी आहे. याबाबत सकारात्मक विचार करण्याचे संकेत रुबिओ यांनी दिले असले तरी जमिनीवरील वास्तव बदललेले नाही. 'नाटो'तून बाहेर पडणारी अमेरिका 'क्वाड'चेही विसर्जन करणार काय, अशी भीती जपान, ऑस्ट्रेलियाला होती. पण ही बैठक होत आहे. चीन दौर्‍यातून हाती काहीही न लागल्याचा हा परिणाम असू शकतो. ओबामांच्या काळात चीनचा आशिया खंडातील विस्तारवाद रोखण्यासाठी पिव्हॉट टू एशिया हा कार्यक्रम हाती घेतला होता. भारताला चीनचा काऊंटरवेट म्हणून पुढे आणण्यासाठी ही योजना होती. व्यापारी वृत्तीच्या ट्रम्प यांनी भारताला वळसा घालून थेट चीनशी नाते जुळवण्याचा प्रयत्न करून पाहिला. पण ड्रॅगनचे फुत्कार अनुभवल्यानंतर त्यांना उपरती झाल्याचे दिसते. अमेरिकन न्यायालयाने ट्रम्प यांचे टॅरिफ धोरण मुळासकट मोडून काढले. त्याचा आधार घेऊन ट्रम्प प्रशासन भारतासोबत व्यापार करार करण्यास तयार झाले तर रुबिओ यांची ही भेट सार्थ ठरली असे म्हणता येईल. नसता पंतप्रधान मोदींना दिलेले अमेरिका भेटीचे आमंत्रणही 'लबाडाघरचे आवतण' ठरू शकते. राष्ट्रीय नेतृत्वांचा जाहीर उपमर्द करण्याचा ट्रम्प यांचा खोडसाळपणा युक्रेन, जर्मनी, इंग्लंड या देशांच्या राष्ट्राध्यक्षांबाबत काय पातळी गाठतो हे जगाने पाहिले आहे. त्यामुळे पंतप्रधान मोदींनी अमेरिकेची भूमिका पूर्णपणे समजून घेत पुढील पावले चाणाक्षपणाने टाकणे गरजेचे आहे.

# बौद्धांचे संविधानिक अधिकारावर कोणी बोलत का नाही?

महारकी सोडल्यास महार समाजाचे किती मोठे नुकसान होणार हे सांगणारे हरिजन तेव्हा होते.आणि आता जनगणा करतांना महार न लिहल्याने किती नुकसान होणार आहे हे सांगणारे आरक्षणाचे लाभार्थी मोठया संख्येने बोलत आहेत.महार म्हणून किती लोकांना सरकारी नोकऱ्या मिळाल्या?. महार म्हणून ज्यांनी शिक्षण घेतांना आरक्षणाची सवलत मिळवली.त्यातील काही लोकांना नोकरीत व पदोन्नती मध्ये आरक्षणाची सवलत मिळाली त्यांचे प्रमाण पाच टक्के सुद्धा नसेल. त्यांच्या कुटुंबातील दुसरी तिसरी पिढी आज ही महार आरक्षणाचा लाभ घेत आहेत. तेच आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी आघाडीवर असतात.पण कोणत्याही जन आंदोलनात त्यांचा त्याच्या कुटुंबंचा सहभाग बिलकुल नसतो. सामाजिक बांधिलकी म्हणून त्यांचे योगदान शून्य असते. आणि ज्याचे आहे ते मान सन्मानचे हक्कदार असतात. त्याची दखल ग्रामीण भागातील व शहरी भागातील झोपडपट्टीत राहणारा असंघटित कष्टकरी समाज मोठया आनंदाने गर्वाने जयंतीनिमित्त घेत असतो.

महार म्हणून आरक्षण घेणारे कामगार कर्मचारी अधिकारी ज्या सरकारी खात्यात कायमस्वरूपी नोकरी करतात तिथे ते आंबेडकरी विचाराच्या ट्रेड युनियनचे साधे सभासद नसतात.पण आरक्षणाला विरोध करणाऱ्या विचारधारेच्या ट्रेड युनियन संघटनेचे वार्षिक सभासद होऊन आर्थिक देणगीदार असतात.तेव्हा त्यांना आपली संख्या कमी असल्यामुळे आंबेडकरी विचाराच्या ट्रेड युनियनचे सभासद होणे फायद्याचे वाटत नाही. पण जेव्हा पदोन्नतीमध्ये डावल्या जाते. किंवा भ्रष्टाचारा मध्ये पकडल्या जाते. तेव्हा त्यांना जातीमुळे अन्याय झाल्याचे जाणवते.मग त्याना आपला आंबेडकरी समाज व समाजाच्या संघटना आठवतात. तो पर्यंत त्यांना अन्याय अत्याचारांच्या विरोध जनआंदोलन करणारे कार्यकर्ते,नेते बेरोजगार बिनकामाचे वाटतात.परिणामची पर्वा न करता अन्याय अत्याचारच्या विरोधात धन दांडग्या,जात दांडग्या राजकीय वर्चस्व असलेल्या लोकांच्या विरोधात जनआंदोलन करणाऱ्या कार्यकर्त्याची नेत्यांची कदर केल्या जात नाही.आर्थिक परिस्थिती नसतांना जन आंदोलन करणे,न्यायालयीन लढाई लढणे आणि नेतृत्व करणे हे सोपी काम नसते. त्यासाठी जिद्ध,त्याग कष्ट करण्याची हिंमत लागते. ती उच्च सुशिक्षित लोकात नसते.आता पर्यंतचा इतिहास तापसून पहा.जन आंदोलन करणाऱ्या कार्यकर्त्यांना असंघटित कष्टकरी कामगार,मजदूर मोठया संख्येने प्रामाणिक पणे आर्थिक मदत करून जन आंदोलनात सहभागी होतो.आणि हा सुरक्षित नोकरीं करणारा सुरक्षित ठिकाणी राहणारा स्वता सहभागी होत नाहीचं पण कुटुंबातील बायको,मुलामुलींना सहभागी होऊ देत नाही. आरक्षणाच्या सर्व सवलती घेण्यासाठी हा नेहमीच पुढे असतो.

सरकारी खात्यातील अनेक कायमस्वरूपी काम असलेल्या जागा भरल्या जात नाही. सेवानिवृत्त कामगारांच्या खाली झालेल्या जागा भरल्यात जात नाही. आरक्षणाचा बॅकलॉग भरल्या जात नाही.तेव्हा यांच्या मनुवादी हिंदुत्व मानणाऱ्या ट्रेड युनियन संघटना महासंघ या विरोधात बोलून ठोस भूमिका घेत नसल्यामुळे कायमस्वरूपी चालणारे कामे कंत्राटी पद्धतीने कंत्राटी कामगार भारती करून केली जातात.त्यामुळेच आरक्षणामुळे सरकारी नोकरीत मिळणारी सवलत आपोआप बंद करण्यात आली. त्यावेळी यांना सनदशीर मार्गाने रस्त्यावर जन आंदोलन किंवा न्यायायल्यात संविधानिक लढाई करावी असेल वाटले नाही.कारण तेव्हा हे स्वतःचा विचार करत असतात. त्यांना समाजाचे काही घेणेदेणें नसते.उपवर्गीकरण अ.ब,क,ड होण्याची सुरवात झाली. कोणताही आवाहल प्रसिद्ध न होता. त्यावर सूचना मागविण्यात आल्या आणि नेहमीच जन आंदोलने करणारे बेरोजगार कार्यकर्ते कामाला लागले.ज्यांना आरक्षणाच्या सवलतीचा कोणताही फायदा झाला नाही.होणार नाही तरी नेहमी सारखे ते लोकं जनआंदोलन करतात.हिच मोठी शोकांतिका आहे.

महार जातीचे आरक्षण मिळवण्यासाठी लढणारे,१४ ऑक्टोबर १९५६ बौद्ध धम्माची दिक्षा घेणारे बौद्धांचे संविधानिक अधिकार मिळण्यासाठी कोणताही लेखी पत्र व्यवहार करतांना दिसत नाही.महार जातीच्या सवलती साठी लिहणारे बोलणारे बुद्धिजीवी, विचारवंत,साहित्यिक,संपादक,माजी न्यायधीस,प्राध्यापक,डॉक्टर,वकील बौद्धांचे संविधानिक अधिकारावर का बोलत,लिहत नाही.भारतीय संविधानात अल्पसंख्याक समाजाला काय संविधानिक अधिकार मिळाले पाहिजे हे घटनाकारांनी अगोदर लिहून ठेवले आहे.त्यानंतर त्यांनी १९५६ बौद्ध धम्माची दीक्षा घेतली. त्यावेळी त्यांनी जाहीर पणे सांगितले होते, तुमच्या सवलती माझ्या कोटाच्या खिशात सुरक्षित आहेत.ते घेण्यासाठी तुम्ही लायक बना.शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे ते पिल्यावर तो गुरगुरणारा असावा. त्यासाठी मी शिक्षण संस्था काढली आहे.त्यासाठी प्रत्येक तालुक्यात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना राहण्यासाठी वस्तीगृह निर्माण झाली पाहिजेत.हा संदेश त्यांना कार्यकर्त्यांना दिला होता.त्यांचा आदेश मानणाऱ्या निष्ठावंत कार्यकर्त्यांनी त्याची अंमलबजावणी केली.व तालुक्यात वस्तीगृह निर्माण केली.१९५६ ते १९९० पर्यंत ती वस्तीगृह प्रत्येक तालुक्यात जिल्ह्यात होती.त्यात राहून शिक्षण घेणारे विद्यार्थी सरकारी नोकरीसाठी आरक्षणाची सवलत घेणारे लाभार्थी झाले.त्यांनी मागे उलटून पाहिले नाही.ते गाडी,बंगला साडीत सर्व विसरले.ते आरक्षणाचे लाभार्थी सेवानिवृत्त नंतर ही पेन्शन धारक आहेत.त्यांची आर्थिक परिस्थिती संपत्ती आज ही लक्षवेदी आहे. तरी ते चळवळी च्या काही कामाचे नाहीत. त्यांचे योगदान नाही ज्याचे आहे त्यांना समाज डोक्यावर घेतो.



बौद्धांना अल्पसंख्यांक म्हणून काय अधिकार आहेत याकडे कोणी लक्ष देण्यासाठी का तयार नाही. कारण महार हिंदू म्हणून राहू शकतात. आचरण करू शकतात.पण बौद्ध बनून महाराचे आचरण करू शकणार नाही तर २२ प्रतिज्ञा पालन करावे लागेल. हिच खरी गोची झाली आहे.१९८० नंतर महार म्हणून नोंद असलेल्या किती लोकांना शिक्षणात नोकरीत व पदोन्नती मध्ये फायदा झाला.ग्रामीण भागातील शेतमजूर,शहरी भागातील झोपडपट्टीत राहणारा बहुसंख्य असंघटित कष्टकरी कामगार कारागीराचा मुलगा मुलगी दहावी बारावीच्या पुढे गेला नाही. अनेकांनी मध्येच शिक्षण सोडून दिले आणि मुलगा बापासोबत नाक्यावर काम करणारा बांधकाम कामगार, झाला,मुलगी आई सोबत घरेलू कामगार झाली. त्यांना आरक्षणाचा कोणताही फायदा मिळाला नाही तरी ते डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाने निळा झेंडा हातात घेऊन निघणाऱ्या जन आंदोलनात सहभागी होतात.हाच असंघटित कष्टकरी कामगार,शेतमजूर कशाची पर्वा न करता प्रत्येक वेळी सहभागी होतो. हेच आरक्षणाच्या सवलतीचा शंभर टक्के लाभ घेणारा लाभार्थी विसरतो.जन गणनेत महार लिहल्याने किती नुकसान होणार हे सांगणारे लिहणारे बौद्ध झाल्यावर किती सामाजिक, शैक्षणिक,आर्थिक आणि राजकीय फायदा झाला हे काय सांगत नाही. बौद्धांचे संविधानिक अधिकारावर कोणी बोलत का नाही?.बौद्ध झाल्यावर आचरण केल्यावर आम्ही जागतिक पातळीवर जोडल्या जाणार आहोत. याचा विचार का केल्या जात नाही.

**सागर रामभाऊ तायडे**
**९९२०४०३८५९, भांडुप,मुंबई.**

# महाराष्ट्राचे प्राचीन वैभव : प्राचीन बौद्ध लेणी आणि गड-किल्ले संरक्षण ही प्रत्येक तालुक्याची सामूहिक जबाबदारी..!

महाराष्ट्राच्या डोंगरकपाऱ्यांत, सह्याद्रीच्या कठीण कातळांत आणि निसर्गाच्या शांत कुशीत आजही भारताचा प्राचीन इतिहास जिवंत उभा आहे

तो इतिहास म्हणजे - बौद्ध लेणी संस्कृती आणि गड-किल्लयांचे वैभव ! महाराष्ट्रात जसे १२०० पेक्षा अधिक बौद्ध शैलकृत लेणी आहेत. तसेच अंदाजे ३५० हून अधिक गड-किल्लेही आहेत.

सह्याद्रीच्या डोंगररांगांत उभे असलेले हे गड केवळ युद्धभूमी नव्हते. ते स्वराज्याचे स्वप्न, शौर्य, दूरदृष्टी, अभिमान आणि अस्मितेची जिवंत प्रतीके आहेत.

भारतातील सर्वाधिक लेणी महाराष्ट्रात आहेत, ही केवळ अभिमानाची गोष्ट नाही, तर ती आपल्या प्राचीन ऐतिहासिक,भौगोलिक, सामाजिक राजकीय, सांस्कृतिक,शैक्षणिक आणि आर्थिक वैभवाची जिवंत ओळख आहे. म्हणूनच महाराष्ट्राला 'लेणी आणि 'गड-किल्लयांचा वारसा लाभलेली भूमी' आणि असे म्हटले जाते. अजिंठा लेणी, वेरूळ लेणी, कार्ले लेणी,भाजे लेणी, कान्हेरी लेणी यांसारख्या असंख्य लेणी केवळ दगडात कोरलेल्या गुहा नाहीत. त्या भारतीय ज्ञानपरंपरेच्या, बौद्ध संस्कृतीच्या, स्थापत्यकलेच्या, व्यापारमार्गांच्या आणि मानवी बुद्धिमत्तेच्या जिवंत साक्षी आहेत. दोन हजार वर्षांपूर्वी कोणतीही आधुनिक यंत्रसामग्री नव्हती. विजेची सुविधा नव्हती. तरीही त्या काळातील कारागिरांनी कठीण कातळ फोडून चैत्यगृह, विहार,ध्यान शयन आणि गृह, विश्रांती पाण्याचे टाकं, शिल्पकला आणि भित्तिचित्रे निर्माण केली. आज विज्ञान प्रगत झाले, तंत्रज्ञान पुढे गेले. पण त्या काळातील संयम, कलादृष्टी आणि समाजहिताची भावना आपण जपू शकलो का ? हा प्रश्न मनाला अस्वस्थ करतो. याच सह्याद्रीत उभे आहेत महाराष्ट्राचे गड-किल्ले-शौर्य, स्वाभिमान आणि संघर्षाचे प्रतीक ! राजगड, रायगड किल्ला, शिवनेरी किल्ला, लोहगड यांसारखे गड तरुणांना प्रेरणा देतात. मात्र अनेकदा त्या गडांच्या परिसरात असलेल्या प्राचीन लेणींकडे दुर्लक्ष होते.

खरे तर 'जिथे गड, तिथे लेणी' हा इतिहासाचा महत्त्वाचा धागा आहे. अनेक किल्लयांच्या आसपास प्राचीन व्यापारी मार्ग, बौद्ध लेणी आणि पाण्याची व्यवस्था दिसून येते. म्हणून तर त्याच ठिकाणी गड किल्ले विकसित केले. म्हणजेच, गड आणि लेणी हे वेगळे नाहीत. ते महाराष्ट्राच्या इतिहासाचे परस्परांशी जोडलेले अध्याय आहेत. अभिमानाची बाब म्हणजे अजिंठा लेणी, वेरूळ लेणी आणि एलिफंटा लेणी यांना UNESCO च्या जागतिक वारसा स्थळांचा दर्जा मिळाला आहे. या लेणी आज जगभरातील पर्यटक, इतिहास अभ्यासक आणि संशोधकांना आकर्षित करतात. मात्र महाराष्ट्रात याशिवायही अनेक ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाच्या लेणी आहेत. ज्यांना अजूनही जागतिक पातळीवरील ती मान्यता मिळालेली नाही, ही खंत कायम मनात राहते. लेण्याद्री लेणी, कार्ले लेणी, भाजे लेणी, कान्हेरी लेणी यांसारख्या लेणी प्राचीन भारतीय स्थापत्यकला, बौद्ध संस्कृती आणि व्यापार इतिहासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत. योग्य संवर्धन, संशोधन आणि जागतिक स्तरावर प्रभावी मांडणी झाली, तर भविष्यात अशा अनेक लेणींना देखील UNESCO जागतिक वारसा स्थळांमध्ये स्थान मिळू शकते. पण त्यासाठी शासनासोबतच समाजानेही पुढाकार घेणे अत्यंत गरजेचे आहे. अभिमानाची आणखी एक बाब म्हणजे अलीकडेच Maratha Military Landscapes of India या नावाने महाराष्ट्रातील अनेक ऐतिहासिक गड-किल्लयांचा UNESCO च्या जागतिक वारसा यादीत समावेश करण्यात आला आहे.

प्रतापगड, सिंधुदुर्ग किल्ला यांसह महाराष्ट्रातील दुर्गवैभवाला मिळालेली ही जागतिक मान्यता म्हणजे संपूर्ण महाराष्ट्रासाठी अभिमानाचा क्षण आहे. हा सन्मान केवळ दगडी वास्तूंना मिळालेला नाही, तर तो महाराष्ट्राच्या शौर्याला, इतिहासाला आणि आपल्या पूर्वजांच्या दूरदृष्टीला मिळालेला जागतिक सलाम आहे. आज महाराष्ट्रात अनेक मंडळे, संस्था, इतिहास अभ्यासक, लेखक, संशोधक आणि दुर्गप्रेमी गड-किल्ले तसेच लेणी संवर्धनासाठी अविरत कार्य करत आहेत. स्वच्छता मोहीम, इतिहासभ्रमंती, माहितीपर व्याख्याने, संशोधन आणि जनजागृतीच्या माध्यमातून हा ऐतिहासिक वारसा जपण्याचा प्रामाणिक प्रयत्न सुरू आहे. त्यांचे हे कार्य निश्चितच कौतुकास्पद आणि प्रेरणादायी आहे. मात्र एवढ्यावरच थांबून चालणार नाही.

गावागावांनी, तालुक्यांनी आणि जिल्ह्यांनी एकत्र येऊन- 'माझा वारसा: 'बौद्धलेणी आणि गड-किल्ले' ही व्यापक लोकचळवळ उभी करणे अत्यंत आवश्यक आहे.

कारण गड-किल्ले आणि लेणी हा फक्त इतिहास अभ्यासकांचा किंवा संवर्धकांचा विषय नाही; तो आपल्या प्रत्येकाच्या अस्मितेचा, ओळखीचा आणि जबाबदारीचा विषय आहे. मात्र आज अनेक लेणी आणि गड उपेक्षेच्या छायेत आहेत. कुठे भिंतींवर नावे कोरली जातात. कुठे प्लास्टिकचा कचरा टाकला जातो. तर कुठे वर्षानुवर्ष दुर्लक्षित राहिल्याने,अतिक्रमण आणि अज्ञानामुळे ऐतिहासिक वारसा आज धोक्यात आहे. ज्या लेणींनी हजारो वर्षे पाऊस, वादळे आणि काळाचे आघात सहन केले, त्या आजही प्राचीन बौद्ध गौरवशाली इतिहासाची साक्ष देत दिमाखाने उभ्या आहेत. ज्या गडांनी स्वराज्याच्या संघर्षाचे साक्षीदार होण्याचा मान मिळवला. आणि ज्या प्राचीन बौद्ध लेणींनी हजारो वर्षे भारतीय संस्कृती, ज्ञानपरंपरा आणि मानवी बुद्धिमत्तेचे वैभव जपले, ते आज मानवी दुर्लक्ष, अज्ञान आणि उपेक्षेमुळे हळूहळू विदीर्ण होत आहेत. त्यामानाने गड किल्लयांची स्वच्छता आणि देखभाल मोठ्या



प्रमाणामध्ये होताना दिसून येते. त्यामानाने गड-किल्लयांची स्वच्छता, संवर्धन आणि देखभाल काही प्रमाणात होताना दिसून येते. मात्र महाराष्ट्रातील असंख्य प्राचीन बौद्ध लेण्या आजही उपेक्षा, अज्ञान आणि दुर्लक्षाच्या छायेत बुद्धांचा शांतीचा संदेश देत शांतपणे उभ्या आहेत. अनेक ठिकाणी त्यांची अवस्था अत्यंत दयनीय असून, योग्य माहिती, संरक्षण आणि जनजागृतीच्या अभावामुळे हा अमूल्य ऐतिहासिक वारसा हळूहळू नष्ट होण्याच्या धोक्यात आहे.

हजारो वर्षांचा इतिहास आपल्या कातळांत जपून उभ्या असलेल्या या लेण्या आजही जणू आपल्या संरक्षणाची आणि मानवी संवेदनशीलतेची शांतपणे वाट पाहत आहेत.

लेणी आणि गड-किल्लयांचे संवर्धन ही फक्त पुरातत्त्व विभागाची जबाबदारी नाही. या वारशाकडे होणारे दुर्लक्ष संबंधित यंत्रणांपर्यंत पोहोचवणे आणि त्याच्या संरक्षणासाठी पुढाकार घेणे ही प्रत्येक गावाची, प्रत्येक तालुक्याची आणि प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी, नगरसेवक, ग्रामपंचायत, नगरपालिका तसेच प्रशासन यांचाही सक्रिय सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे. लोकसहभागातून जनजागृती मोहीम, स्वच्छता उपक्रम, माहितीफलक आणि इतिहासभ्रमंती यांसारखी कामे एकत्रितपणे झाली, तर ही चळवळ अधिक व्यापक आणि सर्वसमावेशक बनेल.


कारण इतिहास जपण्याचे काम हे संघर्षातून नव्हे, तर समाज, प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांच्या सामूहिक सहभागातून अधिक प्रभावीपणे घडू शकते. जर प्रत्येक तालुका पातळीवर 'लेणी व गड संरक्षण समिती' स्थापन झाली आणि स्थानिक लोकप्रतिनिधी, प्रशासन, युवा, इतिहासप्रेमी, शिक्षक, विद्यार्थी आणि ग्रामस्थ एकत्र आले, तर हा वारसा अधिक प्रभावीपणे जपला जाऊ शकतो. लेणी आणि गड-किल्लयांचे योग्य संवर्धन झाले, तर त्यातून मोठ्या प्रमाणावर पर्यटनवृद्धी आणि रोजगारनिर्मितीही होऊ शकते.

आज अनेक बौद्ध लेणींवर प्रशिक्षित गाईड, स्थानिक इतिहास अभ्यासक, स्वच्छता व्यवस्था, पर्यटन सुविधा आणि स्थानिक हस्तकला यांची मोठी गरज आहे. जर प्रत्येक तालुक्यात स्थानिक युवकांना इतिहास आणि पर्यटनाचे प्रशिक्षण दिले, तर पर्यटनाला चालना मिळून अनेक तरुणांना रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होऊ शकतात. इतिहास जपताना रोजगार निर्माण होणे, हीच खरी शाश्वत विकासाची दिशा ठरू शकते. महाराष्ट्राला निसर्ग, इतिहास, गड-किल्ले, लेणी आणि सांस्कृतिक वारसा यांचे अनोखे वरदान लाभले आहे. या ठेव्याचे नियोजनबद्ध संवर्धन आणि जागतिक पातळीवर प्रभावी सादरीकरण झाले, तर भविष्यात महाराष्ट्राची ओळख एक प्रभावी 'पर्यटन राज्य' म्हणून निर्माण होऊ शकते. नव्हे ते भारतात पर्यटन बाबत पहिल्या स्थानावर येऊ शकते. एकट्या पर्यटनावर महाराष्ट्र आर्थिक दृष्ट्या सबल होऊ शकते. प्राचीन इतिहास, निसर्ग जपत विकास घडवणे, हीच खरी प्रगती ठरू शकते. स्थानिक लोकांना जेव्हा आपल्या परिसरातील लेणी आणि गडांचा इतिहास समजतो, तेव्हा ते फक्त पर्यटनस्थळ राहत नाहीत; ते आपल्या अस्मितेचा भाग बनतात. आणि जिथे अस्मिता जागी होते, तिथे संरक्षण आपोआप सुरू होते.

हा इतिहास महाराष्ट्रातील प्रत्येकाच्या जिव्हाळ्याचा विषय असायला हवा. तो जाती धर्मा पलीकडील असायला हवा. कारण हा ठेवा कोणत्याही एका जातीचा, धर्माचा किंवा व्यक्तीचा नाही; तो आपल्या पूर्वजांनी हजारो वर्षांपूर्वी पुढच्या पिढ्यांसाठी जपून ठेवलेला अनमोल गौरवशाली वारसा आहे. ज्या हातांनी कठीण कातळ फोडून लेणी निर्माण केली, ज्या शूर वीरांनी गड-किल्लयांसाठी संघर्ष केला, त्यांच्या कष्टांकडे आणि इतिहासाकडे आपण दुर्लक्ष करणे ही अत्यंत चिंताजनक आणि दुःखद बाब आहे. महाराष्ट्रातील प्रत्येक नागरिकाला आपल्या लेणी, गड-किल्लयांचा आणि इतिहासाचा अभिमान असायला हवा. फक्त अभिमानच नाही, तर त्याची योग्य माहितीही असायला हवी. कारण ज्यांना आपल्या इतिहासाची ओळख नसते, ते आपल्या वारशाचे महत्त्वही विसरू लागतात. आज गरज आहे ती इतिहासाबद्दल संवेदनशीलता, आदर, बांधिलकी आणि निर्माण करण्याची. तरुणांना गडांसोबत लेणींचाही इतिहास सांगण्याची. पूर्वजांच्या वारशाकडे केवळ पर्यटनस्थळ म्हणून नव्हे, तर आपल्या अस्मितेचा भाग म्हणून पाहण्याची. आणि सोशल मीडियाच्या पिढीला इतिहासाशी भावनिकरीत्या जोडण्याची. इतिहासाबद्दल जागरूकता आणि अभिमान निर्माण करण्याची. शाळा आणि महाविद्यालयांमधून स्थानिक इतिहास अभ्यास आणि वारसा संवर्धन उपक्रम राबवले, तर पुढची पिढी आपल्या इतिहासाशी अधिक घट्ट जोडली जाईल. अनेक लेणी आणि गडांचा इतिहास अजूनही सामान्य लोकांपर्यंत पोहोचलेला नाही. त्यामुळे त्यांचे डिजिटल दस्तऐवजीकरण, माहितीपट आणि स्थानिक भाषेत माहिती उपलब्ध करणेही काळाची गरज आहे.

स्थानिक भाषेत माहितीफलक लावण्याचीआणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे 'हा वारसा आपला आहे' ही भावना प्रत्येक मनात रुजवण्याची. कारण लेणी आणि गड-किल्ले हे फक्त दगड डोंगर, किंवा मनोरंजन सहल करण्याची ठिकाणे नाहीत ते आपल्या पूर्वजांच्या बुद्धिमत्तेचा, शौर्याचा आणि संस्कृतीचा जिवंत इतिहास आहेत...ते आजही शांतपणे आपल्याला हाक देत आहेत आम्हाला जपाकारण आमच्यात तुमची ओळख जिवंत आहे.

आज गरज आहे ती- फक्त इतिहास वाचण्याची नाही, तर तो जपण्यासाठी उभे राहण्याची ! प्रश्न आहेत सह्याद्री आजही बोलत आहेत्याची आर्त हाक आपल्याला कधी ऐकू येईल का ? त्याच्या कातळांत इतिहास कोरलेला आहे तो वाचवण्यासाठी आपण जागे होणार आहोत का ? 'पूर्वजांचा ठेवा वाचवण्यासाठी प्रत्येक तालुका जागा होणार का..?



**प्रा. डॉ. छाया मित्तर,**
**निवृत्त प्राचार्या, डोंबिवली.**
**९७७३४१५४६९**

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्वप्नांना साकार करणे, हीच रमाईला खरी आदरांजली होय - बी. बी. मेश्राम

## फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशनची १७२ वी शतकोत्तर मोफत वैचारिक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न

**छत्रपती संभाजी नगर/प्रतिनिधी :** फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशन व दि ऑल इंडिया नाग संघाच्या संयुक्त विद्यमाने रमाई स्मृतिदिनानिमित्त ''स्त्रियांची प्रगती ज्या प्रमाणात झाली असेल त्यावरून एखाद्या समाजाची प्रगती मी मोजत असतो.'' या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या ऐतिहासिक, प्रासंगिक विषयावर १७२ वी शतकोत्तर मोफत वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संस्थेचे कार्यालय, साकेत नगर, छत्रपती संभाजीनगर येथे २४ मे २०२६ ला संपन्न झाली.

फुले, शाहू, आंबेडकराईट स्टडी फाउंडेशनचे संचालक बी. बी. मेश्राम अध्यक्षीय मार्गदर्शन करताना म्हणाले की, रमाईला अभिवादन करताना आता केवळ अगरबत्ती लावून चालणार नाही तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरच्या स्वप्नांना साकार करावे लागेल जेणेकरून रमाईच्या त्याग व समर्पणाला अर्थपूर्णतः प्राप्त होईल. ज्यांची ज्या ज्या ठिकाणी प्रतिनिधी म्हणून नियुक्ती झालेली आहे, त्यांनी त्या त्या ठिकाणी आपआपल्या पदाला न्याय देण्याचे कार्य केले पाहिजे. मुद्दा कुठलाही असो मुद्द्याच्या दोन्ही बाजू तपासल्या पाहिजेत आणि सत्याच्या मार्गाने मार्गक्रमण केले पाहिजे. महिलाना जीवनाच्या सर्व क्षेत्रात समानता प्राप्त होण्यासाठी ताराबाई शिंदे लिखित स्त्री-पुरुष तुलना या ग्रंथाचे आक्रमण केले पाहिजे. संयुक्त कुटुंब पद्धती कडून विभक्त कुटुंब पद्धतीकडे जाणाऱ्या समाजाला पुनश्च संयुक्त कुटुंब पद्धतीकडे वळविले पाहिजे. मानवी इगो अर्थात अहंकारामुळे कुटुंबासह समाजाचा मोठ्या प्रमाणात -हास होत चालला आहे. या अहंकाराची शस्त्रक्रिया करण्याची कोणतीही प्रक्रिया



सध्या तरी उपलब्ध नाही म्हणून समाजाला अधोगतीपासून वाचवायचे असेल तर प्रत्येकाने अहंकार सोडावा लागेल त्यामुळे सुदृढ समाजाचे निर्मिती करता येईल. आई आपल्या आपण त्यांच्या अति प्रेमापोटी त्यांच्या चुकावर पांघरून घालत असल्यामुळे वर्तमानात कलेक्टरची मुले क्लर्क सुद्धा होताना दिसत नाहीत. अशावेळी विकासाच्या वल्गना करणारा समाज विनाशाकडे वाटचाल करीत आहे की काय? अशी उर्वरित समाजाची सद्यस्थिती बघून शंका येत आहे. करिता प्रत्येक कुटुंबाने आपल्या कौटुंबिक समस्या सोडविण्याकरिता फॅमिली संसद अमलात आणली पाहिजे. तसेच सामाजिक समस्या निर्मूलनासाठी सामाजिक सभागृहात सामाजिक संसदेची अंमलबजावणी केली पाहिजे. जेणेकरून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रतिपादन केलेल्या लोकशाहीची अंमलबजावणी करता येईल. या सर्व प्रक्रियेत महिलांना सहभागी करून घेऊ शकलो तर मग रमाईला आदरांजली अर्पण केल्यासारखे होईल. याचे मर्म समाजाला कळावे म्हणून सदरील विषयावर जाणीवपूर्वक कार्यशाळेचे आयोजन केलेले आहे.

उद्घाटनपर मार्गदर्शन करताना जमात इस्लामे हिंद च्या शहराध्यक्ष शाईस्ता कादरी म्हणाल्या की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची दूरदृष्टी लक्षात घेऊन त्यांनी निर्माण केलेल्या भारतीय संविधानाची समाज जीवनात काटेकोरपने अंमलबजावणी केली तर स्त्रियासह संपूर्ण समाजाची प्रगती होऊ शकेल.

प्रमुख वक्ते म्हणून बोलताना डॉ. अनिल गायकवाड म्हणाले की, जीवनाच्या सर्व क्षेत्रात महिलांना ५०% आरक्षण अर्थात प्रतिनिधित्व दिले पाहिजे. करिता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा महिला विषयक शिक्षण, आर्थिक सशक्तिकरण, त्यांच्या शासन प्रशासनात सहभाग, स्वास्थ्य आणि सन्मान इत्यादी विषयावरील दृष्टिकोन समजून घेण्यासाठी चर्चासत्रे आयोजित केली पाहिजेत.

याप्रसंगी बोलताना समन्वयक विलास रामटेके म्हणाले की, महिला प्रतिनिधित्वाला प्राधान्य दिले पाहिजे. राहुल मेश्राम म्हणाले की, महिलांना स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी स्वसंरक्षणाचे धडे दिले पाहिजेत. सम्यक रामटेके म्हणाले की, पुरुषांच्या प्रगती मागे जसा महिलांचा हात असतो; तसाच महिलांच्या प्रगती मागे सुद्धा पुरुषांचाच हात असतो. डॉ. कल्पना गंगावणे म्हणाल्या की, अशा विषयावर चर्चा होणे ही काळाची गरज आहे. चंदा मगर मॅडम म्हणाल्या की, महिला मोठमोठ्या उच्च पदावर पोहोचल्या असल्या तरी निर्णय प्रक्रियेत नगण्य सहभाग असतो. सोहेल पटेल म्हणाले की, एकीकडे प्रधानमंत्री महिलांचा सन्मान केला पाहिजे म्हणत असताना दुसरीकडे बिलकिस बानूच्या बलात्काऱ्यांना तुरुंगातून सोडले जाने मुळीच संयुक्तिक नाही. मोहसीन सय्यद म्हणाले की, स्त्रियांच्या प्रगतीने देशाची प्रगती होऊ शकते. राज गायकवाड म्हणाले की, महिलांचा सहभाग वाढविण्यासाठी आवश्यक ते नेतृत्व स्वीकारले पाहिजे. ॲड. सुनीलकुमार नागवंश म्हणाले की, स्वतः बुद्धाच्या विचाराचे पालन न करणारे इतरांना बुद्ध संदेश सांगत आहेत. डी. बी. मेश्राम म्हणाले की, कुठलेही ज्ञान ही एक माहिती असते, त्याचा कसा वापर केला जातो? यावर परिणाम अवलंबून असतात. प्रा. शिवम गायकवाड म्हणाले की, स्त्रियांचे उद्धारक अनेक झाले असले तरी कैवारी मात्र एकच आहे, ते म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर होय. उद्योजक मिलिंद बागुल म्हणाले की, महिलांनी चळवळीत स्वतःचे अस्तित्व निर्माण केले पाहिजे.

सुरुवातीला आदर्शांना पुष्प व पुष्पमाला अर्पण करून स्टडी फाउंडेशनच्या वतीने मान्यवरांचे व उपस्थित प्रतिनिधींचे स्वागत करण्यात आले. याप्रसंगी शबाना शेख यांचीही विशेष उपस्थिती होती. प्रास्ताविक प्रा. विलास कटारे तर सूत्रसंचालन उद्योजक शशिकांत काळे व आभार डॉ. जोगेंद्र पाचगावकर यांनी व्यक्त केले.

## विविध वृत्त...

### पत्रकार औटी यांच्या परिवाराला महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाची सांत्वन भेट!



**जुन्नर/प्रतिनिधी :** पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यातील राजुरी येथील पत्रकार चंद्रकांत सुदाम औटी यांचे नुकतेच हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनामुळे पत्रकारिता क्षेत्रासह परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य संघटक संजय भोकरे व प्रदेश अध्यक्ष निलेश सोमाणी यांच्या सूचनेनुसार, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे, पश्चिम महाराष्ट्र संपर्कप्रमुख सुभाष डोके तसेच जुन्नर तालुका अध्यक्ष नयन डुंबरे यांनी आवटी यांच्या परिवाराची सांत्वन भेट घेतली.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी पत्रकार औटी यांच्या कार्याचा गौरव करताना सांगितले की, त्यांनी आपल्या पत्रकारितेच्या माध्यमातून आणि सहकार चळवळीद्वारे सर्वसामान्य जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी सातत्याने काम केले. आपल्या प्रभावी लिखाणातून त्यांनी समाजातील अनेक प्रश्नांना वाचा फोडली आणि लोकहिताचे कार्य केले.

तसेच महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने औटी यांच्या कुटुंबाला आर्थिक मदत व किराणा साहित्य देऊन आधार देण्याचा प्रयत्न करण्यात आला.

यावेळी डॉ. विश्वासराव आरोटे बोलताना म्हणाले की, ''महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ आपल्या पत्रकार बांधवांच्या कुटुंबाच्या पाठीशी कायम उभा आहे. परिवारावर कोणतीही अडचण किंवा प्रश्न निर्माण झाल्यास पत्रकार संघ नेहमी मदतीसाठी तत्पर राहील.''

या भेटीद्वारे पत्रकार बांधवांमधील एकोपा, सामाजिक बांधिलकी आणि पत्रकार कुटुंबाप्रती असलेली संवेदनशीलता पुन्हा एकदा अधोरेखित झाली.

### अकरावीच्या ८ लाखांपेक्षा जास्त जागा रिक्त राहणार

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यामध्ये यंदा अकरावी प्रवेशासाठीच्या जागांमध्ये २८ हजार ९२९ जागांनी वाढ झाली आहे. त्यामुळे अकरावी प्रवेशासाठी २१ लाख ९८ हजार ५८६ जागा उपलब्ध आहेत. मात्र प्रवेश प्रक्रियेसाठी फक्त १२ लाख विद्यार्थ्यांनी अर्ज भरले आहेत. त्यामुळे यंदा गतवर्षीच्या तुलनेत ८ लाखांपेक्षा जास्त जागा रिक्त राहण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

राज्यभरामध्ये गतवर्षी प्रथमच अकरावी प्रवेश परीक्षा ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात आली होती. गतवर्षी अकरावी प्रवेशासाठी असलेल्या २१ लाख ६९ हजार ६५७ जागांपैकी तब्बल ६ लाख ५८ हजार ८४९ जागा रिक्त राहिल्या होत्या. त्यामुळे यंदा अधिकाधिक विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी अर्ज करावेत यासाठी शिक्षण संचालनालयाने दहावीची अर्ज भरण्यासाठी आज शेवटचा दिवस परीक्षा संपताच अकरावी प्रवेश प्रक्रियेचा भाग १ भरण्याची प्रक्रिया सुरू केली होती. अकरावी प्रवेशाची नियमित फेरी २१ मेपासून ३ जूनपर्यंत राबविण्यात येणार आहे. पहिल्या नियमित फेरीसाठी विद्यार्थ्यांना आज सायंकाळी ६ वाजेपर्यंत अर्ज करता येणार आहे.

अर्ज किती २४ मे रोजी सायंकाळपर्यंत अकरावी प्रवेशासाठी १२ लाख ९ हजार ६१८ विद्यार्थ्यांनी अर्ज भरले आहेत. कोटा प्रवेशाच्या जागा वगळल्यास नियमित फेरीसाठी १७ लाख ४२ हजार ३५५ जागा उपलब्ध आहेत. त्या तुलनेने अर्जाची संख्या फारच कमी आहे. त्यामुळे यंदा नियमित फेरीतील ५ लाख ३० हजारांपेक्षा अधिक जागा रिक्त राहण्याची शक्यता आहे. कोट्याची काय स्थिती कोटा प्रवेशासाठी राबविण्यात आलेल्या विशेष शून्य फेरीपर्यंत ९ लाख ५४ हजार ९३९ विद्यार्थ्यांनी अर्ज भरले होते. त्यापैकी ३९ हजार ६१३ विद्यार्थांनी प्रवेश घेतल्याने कोट्यातील ४ लाख १६ हजार ६१८ जागा रिक्त राहिल्या आहेत. शून्य फेरीनंतर एकूण जागांपैकी २१ लाख ५८ हजार ९७३ जागा रिक्त असून, १२ लाख ९ हजार ६१८ विद्यार्थ्यांनी अर्ज भरले आहेत. त्यामुळे यंदा नियमित फेरी व कोट्यांतर्गत जागा लक्षात घेता ८ लाखांपेक्षा अधिक जागा रिक्त राहण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

गतवर्षीच्या तुलनेत जागांमध्ये वाढ

गतवर्षी अकरावी प्रवेशासाठी २१ लाख ६९ हजार ६५७ जागा उपलब्ध होत्या. त्यामध्ये नियमित फेरीसाठी १८ लाख २३ हजार ९६० जागा तर कोट्यांतर्गत प्रवेशासाठी ३ लाख ४५ हजार ६९७ जागा उपलब्ध होत्या. यंदा अकरावी प्रवेशासाठी २१ लाख ९८ हजार ५८६ जागा उपलब्ध आहेत. यंदा अकरावी प्रवेशाच्या एकूण जागांमध्ये गतवर्षीच्या तुलनेत तब्बल २८ हजार ९२९ जागांची वाढ झाली आहे. मात्र प्रत्यक्षामध्ये कोटा प्रवेशाच्या जागांमध्ये १ लाख १० हजार ५३४ जागांची वाढ झाली आहे. त्याचवेळी नियमित फेरीसाठीच्या जागांमध्ये ८१ हजार ६०५ जागांची घट झाली आहे. त्यामुळे यंदा कोटा प्रवेशासाठी ४ लाख ५६ हजार २३१ जागा तर नियमित फेरीसाठी १७ लाख ४२ हजार ३५५ जागा उपलब्ध झाल्या आहेत.

गतवर्षी अकरावी प्रवेशासाठी नियमित फेरीसाठी १८ लाख २३ हजार ९६० जागा उपलब्ध होत्या. त्यापैकी ११ लाख ६५ हजार १११ जागांवर विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला, तर ६ लाख ५८ हजार ८४९ जागा रिकाम्या राहिल्या. याशिवाय, अल्पसंख्याक, व्यवस्थापन आणि इनहाऊस या कोट्यांतर्गत ३ लाख ४५ हजार ६९७ जागा उपलब्ध होत्या. त्यापैकी १ लाख ६८ हजार ७८२ जागा भरल्या गेल्या, तर १ लाख ७६ हजार ९१५ जागा रिकाम्या राहिल्या आहेत.

## इंधनाच्या दरात विक्रमी चौथी दरवाढ

**मुंबई/प्रतिनिधी :** जागतिक ऊर्जा संकट आणि कच्च्या तेलाच्या किंमतीतील सततच्या चढ-उतारामुळे भारतात पेट्रोल-डिझेलच्या किरकोळ दरांमध्ये पुन्हा एकदा दरवाढ झालीय. देशभरात पेट्रोल २ रूपये ६१ पैसे तर डिझेल २ रूपये ७१ पैशांनी महागलंय. गेल्या १० दिवसांत पेट्रोल आणि डिझेलच्या दरात झालेली ही चौथी दरवाढ आहे. पहिली दरवाढ १५ मे रोजी सुमारे ३ रुपयांनी झाली. त्यानंतर १९ मे रोजी सुमारे ९० पैशांनी, त्यानंतर पुन्हा २३ मे रोजी सुमारे ९० पैशांनी आणि आता अवघ्या दोन दिवसांत २५ मे रोजी पुन्हा एकदा जवळपास २.५ रूपयांची वाढ झालीय. म्हणजे गेल्या १० दिवसांत पेट्रोल प्रति लिटर ७.३० रुपये तर आणि डिझेल प्रति लिटर ८ रूपयांनी महाग झालंय.

जागतिक दरवाढही भिडलीय गगनाला : ही दरवाढ केवळ भारतातच नव्हे, तर जगभरात सुरू आहे. भारतीय चलनानुसार लंडनमध्ये पेट्रोल १९० रूपये प्रति लिटरवर पोहोचलं तर युरोपात ते १७९ रूपये प्रति लिटर दरानं विकलं जात आहे. नेदरलँड्समध्ये पेट्रोलचा दर जवळपास २५५ रूपये इतका असून सध्या हाँगकाँगमध्ये सुमारे ३०० रूपये प्रति लिटरनं विकलं जातंय. पाकिस्तानात मात्र इंधनाच्या दरात ६ रूपयांनी कपात झाली असून तिथं पेट्रोल ४०३ रूपये प्रति लिटरनं विकलं जातंय. भारतात सरकारी मालकीच्या इंडियन ऑइल कॉर्पोरेशन (आयओसी), भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड (बीपीसीएल) आणि हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड (एचपीसीएल) यांचा मिळून भारताच्या इंधन बाजारातील ९० टक्के वाटा आहे. आखाती युद्धामुळे होर्मुझच्या सामुद्रधुनीतून होर्णाया वाहतुकीतील व्यत्ययांचा परिणाम म्हणून फेब्रुवारीपासूनच जागतिक कच्च्या तेलाच्या किमती ५० टक्क्यांनी वधारल्यात.

सध्याच्या परिस्थितीत इंधनदरवाढ अटळ : बीपीसीएल भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेडचे संचालक राज कुमार दुबे यांनी दिलेल्या माहितीनुसार, ''सध्याच्या परिस्थितीत इंधन दरवाढ अटळ आहे. जागतिक बाजारात कच्च्या तेलाच्या किंमतींमध्ये ५० टक्क्यांपर्यंत वाढ झालीय. सुरुवातीला ही परिस्थिती तात्पुरती असल्याचा समज होता. मात्र, ऊर्जा क्षेत्रातील पायाभूत सुविधांचं मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्यानं परिस्थिती लवकर सुधारण्याची शक्यता कमीच आहे. आखाती देशातील तणावामुळे स्ट्रेट ऑफ होर्मुझमधून होणाऱ्या सुमारे २० लाख बॅरल तेल पुरवठ्यावर परिणाम झालेला आहे. या तुटवड्याची भरपाई करण्यासाठी भारतानं तेल आयातीचे स्रोत विविध देशांमध्ये विस्तारले आहेत. पूर्वी भारताकडं तेल पुरवठ्याचे केवळ २० स्रोत होते, सध्या ते ४० वर पोहोचलेत. यात रशिया, आफ्रिका आणि इतर देशांचा नव्यानं समावेश झालाय. त्यामुळे भारताला पुरवठा सुरक्षेच्या दृष्टीनं बऱ्याच प्रमाणात स्थैर्य मिळालं.''

हरित ऊर्जेला प्रोत्साहन देण्याची गरज : या संकटामुळे भारतातील हरित ऊर्जेला अधिक प्रोत्साहन देण्याची आता गरज आहे. गेल्या काहीकाळात देशात २०० गीगावॅटपेक्षा अधिक सौर ऊर्जा क्षमता उभारण्यात आली असून, तेल आयातीवरील खर्चामुळे परकीय चलनसाठ्यावर वाढणारा ताण लक्षात घेता हरित ऊर्जा पर्यायांना अधिक प्रोत्साहन दिलं जातंय. इथेनॉल मिश्रणाच्या २० टक्के उद्दिष्टामुळे पेट्रोलची गरज कमी झाली असून परकीय चलनाचीही बचत होत असल्याचं त्यांनी सांगितलं. याशिवाय, नैसर्गिक वायूचा ऊर्जा मिश्रणातील हिस्सा सध्याच्या ८ टक्क्यांवरून १५ टक्क्यांपर्यंत वाढवण्याचं सरकारचं उद्दिष्ट आहे. कंप्रेस्ड बायोगॅस, सौर ऊर्जा आणि हायड्रोजनसारख्या पर्यायी इंधनांवर भर देणं ही आता काळाची गरज बनलीय, असंही ते म्हणाले.

### पुणेकरांची भाकरी महागणार, गॅसनंतर आता दळणाची दरवाढ, किलोला किती मोजावे लागणार?

**पुणे/प्रतिनिधी :** महागाईच्या झळांनी आधीच सर्वसामान्य नागरिक त्रस्त असताना आता दळणाच्या दरवाढीमुळे गृहिणींच्या मासिक बजेटवर आणखी ताण पडणार आहे. पुणे शहर जिल्हा पीठ गिरणी मालक संघाने १ जूनपासून दळणाच्या दरात वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे गहू, ज्वारी यांसारख्या धान्याच्या दळणासाठी आता प्रतिकिलो १० रुपये मोजावे लागणार आहेत. तर डाळ, भाजणी आणि इतर पदार्थांच्या दळणासाठी प्रतिकिलो १५ रुपये आकारले जाणार आहेत.

सध्या सर्वसाधारण दळणासाठी ८ रुपये प्रतिकिलो दर आकारला जात होता. मात्र, वाढती महागाई, गिरणीसाठी लागणाऱ्या सुट्या साहित्यांच्या वाढलेल्या किमती, वीजबिलाचा वाढता भार आणि गिरणी कामगारांच्या पगारवाढीच्या मागण्यांमुळे हा निर्णय घ्यावा लागल्याचे पुणे शहर जिल्हा पीठ गिरणी मालक संघाचे अध्यक्ष लुईस सांगळे यांनी सांगितले.

# शिक्षणासाठी वयाची अट नसते हे मोटे सरांनी सिद्ध केले !

## एसजी प्रो. अकॅडमीकडून डॉ. कमलाकर मोटे यांचा लातूर येथे गौरव..

## सेवानिवृत्तीनंतर इतिहास विषयात प्राप्त केली पीएच. डी. पदवी

**लातूर/प्रतिनिधी :** ज्ञानसाधना ही अखंड चालणारी प्रक्रिया असून शिक्षणासाठी वयाचे कोणतेही बंधन नसते, हेच उमरगा तालुक्यातील जिल्हा परिषद केंद्रीय शाळेचे सेवानिवृत्त केंद्रप्रमुख कमलाकर मोटे यांनी आपल्या कार्यातून सिद्ध करून दाखवले आहे. नुकतीच त्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाकडून इतिहास विषयात विद्यावाचस्पती (पीएच. डी.) ही सर्वोच्च पदवी प्राप्त झाली आहे. सेवानिवृत्तीनंतरही अत्यंत जिद्दीने अभ्यास करून ही डॉक्टरेट मिळवल्याबद्दल लातूर येथील नामांकित एसजी प्रो. अकॅडमीचे संचालक प्रा. सत्यवान सूर्यवंशी यांच्या हस्ते शनिवारी (ता. २३) रोजी डॉ. कमलाकर मोटे सरांचा विशेष सत्कार करण्यात आला.

या गौरव सोहळ्याप्रसंगी धाराशिव जिल्ह्याचे महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे जिल्हा कार्याध्यक्ष प्रा. डॉ. महेश मोटे, अकॅडमीचे संचालक सोमनाथ गलांडे तसेच लातूर येथील धुळेकर कोचिंग क्लासेसचे संचालक प्रा. अर्जुन धुळेकर आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. कमलाकर मोटे यांनी उमरगा येथील छत्रपती शिवाजी महाविद्यालयाचे इतिहास विभागप्रमुख प्रा. डॉ. भीम माने यांच्या मार्गदर्शनाखाली आपला शोधप्रबंध पूर्ण केला. त्यांनी '' लातूर शहराचा सामाजिक, आर्थिक व राजकीय इतिहास: एक चिकित्सक अभ्यास '' या विषयावर अत्यंत सखोल संशोधन करून आपला प्रबंध विद्यापीठास सादर केला होता. त्यांच्या या संशोधनामुळे लातूरच्या स्थानिक इतिहासाचा एक महत्त्वाचा दस्तऐवज समोर आला आहे. डॉ. मोटे सरांनी आपल्या शासकीय सेवाकाळात शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन त्यांना महाराष्ट्र शासनाचा आदर्श शिक्षक पुरस्कार तसेच विविध नामांकित सामाजिक संस्थांकडून राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. याशिवाय, रोटरी क्लब मुरुम सिटीचे अध्यक्ष म्हणून काम करताना त्यांनी ग्रामीण भागात भरीव सामाजिक कार्य उभे केले. विशेष म्हणजे, त्यांनी स्वतः मरणोत्तर देहदानाचा संकल्प करून समाजासमोर एक आदर्श सामाजिक बांधिलकीचा वस्तुनिष्ठ वस्तुपाठ घालून दिला आहे.

प्रा. सत्यवान सूर्यवंशी म्हणाले की, डॉ. मोटे सरांनी निवृत्तीनंतरही अखंड अभ्यास सुरू ठेवून मिळवलेले हे यश तरुण पिढीसाठी आणि स्पर्धा परीक्षेची




तयारी करणाऱ्या आमच्या अकॅडमीच्या विद्यार्थ्यांसाठी अत्यंत प्रेरणादायी आहे. यश मिळवण्यासाठी केवळ जिद्द, चिकाटी आणि अभ्यासाची ओढ असावी लागते, वयाचा तिथे काहीही संबंध नसतो, हेच मोटे सरांनी दाखवून दिले आहे. त्यांच्या या यशाचा एसजी प्रो. अकॅडमी परिवाराला सार्थ अभिमान आहे.सेवानिवृत्तीनंतरही शिक्षणाचा ध्यास न सोडणाऱ्या डॉ. कमलाकर मोटे सरांचे या यशाबद्दल संपूर्ण धाराशिव व लातूर जिल्ह्यातील शैक्षणिक, राजकीय व सामाजिक क्षेत्रातून सर्व स्तरांवरून विशेष कौतुक व अभिनंदन होत आहे.

# भाजप सरकार संविधान विरोधी, हिंदू राष्ट्र वक्तव्य हा राष्ट्रद्रोह - सुभाष निंबाळकर यांचा घणाघात

## संविधानप्रेमींनी एकत्र येण्याचे आवाहन, आर्य प्रतिनिधी प्रांतीय सभा राबवणार कृती कार्यक्रम

**लातूर/प्रतिनिधी :** सध्याचे भाजप सरकार हे संविधान विरोधी असून ते उघड-उघड भारताला हिंदू राष्ट्र संबोधत आहे, असा गंभीर आरोप आर्य प्रतिनिधी प्रांतीय सभेचे प्रमुख सचिव व जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते सुभाष निंबाळकर यांनी केला आहे.

लातूर येथे रविवारी आयोजित संदेश मेळाव्यात ते बोलत होते. यावेळी त्यांनी राज्याचे मंत्री नितेश राणे यांच्या वक्तव्याचा समाचार घेतला. ''महाराष्ट्र राज्याचे मंत्री नितेश राणे सारखे लोक सतत भारत हे हिंदू राष्ट्र आहे असे वक्तव्य करतात. हा भारताच्या घटनेचा अपमान असून हा राष्ट्रद्रोह आहे, असे मत निंबाळकर यांनी व्यक्त केले.



घटनेतील धर्मनिरपेक्षतेचा दाखला यावेळी बोलताना निंबाळकर यांनी भारतीय संविधानाच्या सरनाम्याचा दाखला दिला. ''भारतीय राज्यघटनेने भारताला सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही गणराज्य म्हणून घोषित केले आहे. घटनेच्या कोणत्याही कलमात भारताला हिंदू राष्ट्र म्हटलेले नाही. असे असताना सत्ताधारी पक्षाचे लोकप्रतिनिधीच जर सातत्याने घटनाबाह्य वक्तव्य करत असतील, तर ती गंभीर बाब आहे,असे ते म्हणाले.

अतिरेकी विचार नेस्तनाबूत करा निंबाळकर पुढे म्हणाले, संविधान प्रेमी आणि धर्मनिरपेक्ष विचारांच्या लोकांनी आता एकत्र येण्याची वेळ आली आहे. अशा राष्ट्रद्रोही व अतिरेकी विचारांना नेस्तनाबूत करणे गरजेचे आहे. आर्य समाजाच्या वतीने अधिकृतपणे हे आवाहन करत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, या विचारांच्या विरोधात लवकरच आर्य प्रतिनिधी प्रांतीय सभेच्या वतीने राज्यव्यापी कृती कार्यक्रम राबवण्याचा संकल्पही त्यांनी या मेळाव्यात जाहीर केला. या कार्यक्रमाची रूपरेषा लवकरच जाहीर केली जाईल, असेही ते म्हणाले.

पार्श्वभूमी गेल्या काही काळात विविध राजकीय नेत्यांकडून भारत हे हिंदू राष्ट्र आहे अशी वक्तव्ये येत आहेत. या वक्तव्यांवरून सामाजिक आणि राजकीय वर्तुळात सातत्याने चर्चा होत असून, ही वक्तव्ये घटनेच्या धर्मनिरपेक्ष तत्त्वाच्या विरोधात असल्याचा आरोप विरोधकांकडून केला जातो. या पार्श्वभूमीवर निंबाळकर यांचे वक्तव्य महत्त्वाचे मानले जात आहे.

## हातातच ग्रेनेड फुटला, बोटाच्या चिंधड्या उडाल्या, अहिल्यानगर पोलीस मुख्यालयात प्रशिक्षणात घडलं भयंकर

**अहिल्यानगर/प्रतिनिधी :** पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर सुरू असलेल्या प्रशिक्षणादरम्यान आज सकाळी एक अत्यंत भीषण आणि धक्कादायक घटना घडली. जमाव पांगवण्याच्या 'मॉक ड्रिल'चे प्रात्यक्षिक सुरू असताना, एका हँडग्रेनेडचा थेट जवानाच्या हातातच भीषण स्फोट झाला. या अपघातात चार प्रशिक्षणार्थी पोलीस कर्मचारी गंभीर जखमी झाले. या स्फोटाची तीव्रता इतकी मोठी होती की दोन पोलिसांच्या बोटाच्या चिंधड्या उडाल्या. जखमींवर रुग्णालयात उपचार सुरू असल्याची माहिती देण्यात आली आहे. आज सकाळी १० वाजेच्या सुमारास घडलेल्या या घटनेमुळे संपूर्ण पोलीस दलात प्रचंड खळबळ उडाली आहे. मुख्यालायाच्या मैदानावर नेहमीप्रमाणे प्रशिक्षणार्थी कर्मचाऱ्यांचे वर्ग सुरू होते. सकाळी १० वाजता वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून हँडग्रेनेड कसा हाताळावा, याची प्रात्यक्षिकासह माहिती दिली जात होती. मात्र, ही माहिती सुरू असतानाच अचानक एका ग्रेनेडचा हातातच स्फोट झाला. या दुर्दैवी दुर्घटनेत शिवराज पवार, शुभम कावरे, गणेश मढे आणि योगेश सोळुंके हे चार प्रशिक्षणार्थी पोलीस कर्मचारी जखमी झाले. यापैकी दोघांची दुखापत अत्यंत गंभीर असून इतर दोन कर्मचारी किरकोळ जखमी आहेत. स्फोटाच्या आवाजाने संपूर्ण पोलीस मुख्यालय परिसर हादरून गेला. घटनेची माहिती मिळताच वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. सर्व जखमी कर्मचाऱ्यांना तातडीने जवळच्या एका खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. सध्या तेथे तज्ज्ञ डॉक्टरांच्या देखरेखीखाली त्यांच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत.

## जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षकांच्या हस्ते संजय राजुळे यांचा राज्यस्तरीय गौरव

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर येथील दयानंद सभागृहात दिनांक २३ मे २०२६ रोजी लॉयन्स क्लब ऑफ लातूर सिटी यांच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय सन्मान कर्तृत्वाचा पुरस्कार सोहळ्यात सामाजिक कार्यकर्ते श्री. संजय राजुळे यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. समाजासाठी सातत्याने आणि निस्वार्थ भावनेने करत असलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांना हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार लातूर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड, पोलीस अधीक्षक अमोल तांबे तसेच न्यूज १८ लोकमतचे सहसंपादक विलास बडे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.




कार्यक्रमाला विविध क्षेत्रातील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार, शिक्षक, डॉक्टर तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. श्री.संजय राजुळे हे गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक, आरोग्य आणि जनजागृती क्षेत्रात सक्रियपणे कार्यरत असून त्यांनी आपले आरोग्य आपली जबाबदारी या अभियानाच्या माध्यमातून महाराष्ट्रासह देशभर आरोग्य जनजागृतीचे व्यापक कार्य सुरू केले आहे. या अभियानांतर्गत त्यांनी व्यसनमुक्ती जनजागृती, आरोग्य शिबिरे, रक्तदान शिबिरे, गरजू रुग्णांना मदत, विशेषतः कॅन्सरग्रस्त रुग्णांना आर्थिक व मानसिक आधार देणे, जैविक शेतीचा प्रसार, वृक्षलागवड, स्वच्छता मोहीम तसेच अनाथ, गरजू आणि दिव्यांग मुलांना मदत असे विविध सामाजिक उपक्रम राबवले आहेत.

त्यांच्या कार्यामुळे अनेक नागरिकांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण झाली असून समाजात सकारात्मक बदल घडवून आणण्यास मोठी मदत झाली आहे. विशेषतः युवकांना व्यसनमुक्त जीवन जगण्याचा संदेश देत निरोगी आणि सशक्त समाज घडविण्याचे कार्य त्यांनी सातत्याने केले आहे. सन्मान कर्तृत्वाचा हा राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त झाल्याने आपले आरोग्य आपली जबाबदारी परिवारासह त्यांच्या सहकाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून हा क्षण संपूर्ण परिवारासाठी अभिमानास्पद आणि प्रेरणादायी ठरला आहे. विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून श्री. संजय राजुळे यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

## लातूर येथे निवृत्तीवेतनधारक आणि आहरण व संवितरण अधिकाऱ्यांसाठी पेन्शन अदालत, कार्यशाळा उत्साहात

### महालेखाकार नागपूर व जिल्हा कोषागार कार्यालय लातूरचा संयुक्त उपक्रम



**लातूर/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील सर्व कार्यालय प्रमुख आणि त्यांच्या अधिपत्याखालील निवृत्तीवेतनधारकांच्या अडीअडचणींचे निवारण करण्यासाठी आज लातूर येथे विशेष कार्यशाळा आणि पेन्शन अदालतीचे आयोजन करण्यात आले होते. नागपूर महालेखाकार आणि लातूर जिल्हा कोषागार कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीमधील डीपीडीसी हॉलमध्ये या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यशाळेत नागपूर महालेखापाल कार्यालयाचे वरिष्ठ लेखाधिकारी मैथिली जगन्नाथन, सहायक लेखाधिकारी चेतनकुमार गुप्ता आणि लेखापाल समिर मीना यांनी उपस्थित सर्व कार्यालय प्रमुखांना निवृत्ती वेतन प्रकरणे (पेंशन पेपर्स) अत्यंत अचूकपणे कसे सादर करावेत, याबाबत सविस्तर व तांत्रिक मार्गदर्शन केले. तसेच निवृत्तीवेतनधारकांना येणाऱ्या विविध अडचणी व समस्या प्रत्यक्ष ऐकून घेत त्यांचे जागेवरच निराकरण केले.

या बैठकीला लातूर जिल्हा कोषागार कार्यालयाच्या जिल्हा कोषागार अधिकारी डॉ. उज्वला भा. पाटील, अप्पर कोषागार अधिकारी ख.नै. खोजे, मा.रो. गुट्टे आणि ना. ए. बुध्दिवंत प्रामुख्याने उपस्थित होते. या पेन्शन अदालतीच्या यशस्वी आयोजनासाठी आर. डी. माने, स्वामी एस.एस., कुलकर्णी ए.डी., एस.व्ही. बिराजदार, ब.म.पांचाळ, अ.द.सिरसाट आणि नामदेव कोकरे यांनी परिश्रम घेतले. कार्यशाळेला जिल्ह्यातील बहुसंख्येने कार्यालय प्रमुख, आहरण व संवितरण अधिकारी आणि निवृत्तीवेतनधारक उपस्थित होते.

## त्युशन एरियाला स्पेशल एज्युकेशन झोन चा दर्जा मिळण्यासाठी पाठपुरावा, भाजपा नेत्या डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी दिला शब्द.. म्हणाल्या, गरज पडल्यास न्यायालयात जाऊ

**लातूर/प्रतिनिधी :** जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक निखिल पाटील यांनी दिलेल्या, लातूर इंडस्ट्रियल इस्टेट वसाहतीतील अनेक कोचिंग क्लासेस , हॉस्टेल्स, खानावळी आणि इतर व्यवसाय बंद करण्याच्या आदेशाला आव्हान देत, या उद्योग भवन परिसरास स्पेशल एज्युकेशन झोन म्हणून मान्यता मिळण्यासाठी आपण पाठपुरावा करू, अशा शब्दांत भारतीय जनता पक्षाच्या प्रदेश उपाध्यक्षा डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी लातूर पॅटर्न बचाव कृती समितीने ट्युशन एरियात आयोजित केलेल्या बैठकीत समितीचे सर्वतोपरी समर्थन केले. या समितीच्या पाठीशी आपण ठामपणे उभे आहोत, असा दिलासाही देत त्यांनी, गरज पडल्यास या प्रश्नावर न्यायालयाचे दरवाजे ठेवण्याचा इशाराही दिला.

जिल्हा उद्योग केंद्राच्या नव्या आदेशा मुळे हवालदिल झालेल्या ट्युशन एरियातील अन्य व्यावसायिकांच्या बैठकीत त्या बोलत होत्या. बैठकीस लातूर शहर भाजपाचे जिल्हाध्यक्ष अजित सिंह पाटील कव्हेकर, भाजपाचे सरचिटणीस प्रवीण कस्तुरे नगरसेवक व माजी स्थायी सभापती अॅड. दीपक मठपती, नगरसेवक विनय जाकते ,ऋषिकेश राजे, राजश्री धोत्रे, अॅड. मीना गायकवाड, प्रवीण सावंत पुनित पाटील ,ओम धरणे आदी उपस्थित होते.

डॉ. अर्चनाताई पाटील पुढे म्हणाल्या, शिक्षणाचा लातूर पॅटर्न घडविण्यात शहरासह लातूर जिल्ह्यातील विविध संस्थाचालकांचा सिंहाचा वाटा असला तरी यामध्ये शिकवणी चालक यांच्यासह संबंधित व्यावसायिकांचा खारीचा वाटा आहे. शिक्षणातील या लातूर पॅटर्नमुळे लातूरच्या अर्थकारणाला गती मिळाली असून त्यामुळे लातूर शहराच्या विकासास हातभार लागला आहे. नीट पेपर फुटी मुळे हा पॅटर्न बदनाम करण्याचा डाव काही जणांकडून सुरू असला तरी लातूर पॅटर्न हे बावन्नकशी सोने आहे, हे वारंवार सिद्ध झाले आहे. हा पॅटर्न जपण्याची आणि त्यास बदनामीपासून वाचविण्यासाठी लातूरकर म्हणून तुम्हा आम्हा सर्वांची जबाबदारी आहे. लातूर पॅटर्न काळीमा लागणार नाही याची दक्षता आपण निश्चितच घेऊ. उद्योग भवन परिसरातील शिकवणी चालकांसह व्यावसायिकांच्या जागेचा प्रश्न आज संकट म्हणून आपल्यासमोर उभा ठाकला आहे. या संकटाला संधी समजून आपण सर्वजण लातूरचे अर्थकारण जशास तसे ठेवून लातूर पॅटर्नला प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी एकत्रितपणे काम करू, अशी ग्वाही त्यांनी दिली. लातूर इंडस्ट्रियल इस्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटी परिसराला पुन्हा गतवैभव मिळवून देण्यासाठी या परिसराला स्पेशल एज्युकेशन झोन म्हणून मान्यता मिळवून देण्यासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करणे आवश्यक आहे. या संदर्भात आपण उद्या सोमवारी



जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांची वेळ घेऊन शिष्टमंडळासह त्यांच्या समोर व्यावसायिकांची बाजू मांडणार आहोत .

समितीच्या माध्यमातून टप्प्याटप्प्याने पुढे जाऊ. शेवटी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रभाऊ फडणवीस यांचीही भेट घेऊन त्यांना साकडे घालू, असे आश्वासन अर्चनाताईंनी दिले. मुख्यमंत्री निश्चितच याचा विचार करून न्याय देतील असा विश्वासही त्यांनी शेवटी व्यक्त केला.

या बैठकीच्या सुरुवातीस लातूर पॅटर्न बचाव कृती समितीच्या सदस्यांनी आपले म्हणणे मांडत आपल्या अडचणींचा आणि व्यथांचा पाढा अर्चनाताई पाटील यांच्यासमोर वाचला. बैठकीपूर्वी अर्चनाताईंनी ट्युशन एरिया भागातील काही व्यावसायिकांना समक्ष भेटून त्यांच्या अडचणी व प्रश्न जाणून घेतले.

## ऊस उत्पादकांसाठी आनंदाची बातमी ! विलास साखर कारखान्याकडून प्रति टन रुपये १०० प्रमाणे दुसरा हप्ता बँकेत जमा

**लातूर/प्रतिनिधी :** मांजरा परिवारातील अग्रणी असलेल्या विलास सहकारी साखर कारखान्यांने गळीत हंगाम २०२५-२६ मध्ये गाळपास आलेल्या ऊसास प्रति टन १०० रुपये प्रमाणे ऊस बिलाचा दुसरा हप्ता बँकेत वर्ग केल्याची माहिती कारखान्याचे व्हा. चेअरमन तथा माजी आमदार वैजनाथराव शिंदे व कार्यकारी संचालक आबासाहेब पाटील यांनी दिली आहे.

सदर हंगामात गाळप झालेल्या ऊसाला कारखान्याने यापूर्वीच एफ.आर.पी.पोटी प्रति मे. टन २७५० रुपये अदा केले असून, सध्या खरीप पेरणीचे दिवस जवळ आल्यामुळे मशागत, पेरणी, बियाणे, खते आदींसाठी शेतकऱ्यांना पैशाची गरज भासणार आहे. ही बाब लक्षात घेऊन शेतकरी हिताचा निर्णय घेत कारखान्याने दुसरा हप्ता देण्याचा निर्णय घेतला आहे.

गळीत हंगाम २०२५-२६ मध्ये कारखान्याने १२५ दिवसात ६,५१,४३१.२३६ मे.टन ऊसाचे गाळप करुन १२.२१ टक्के सरासरी साखर उताऱ्याने ७,१४,४७० क्विंटल साखर उत्पादन केले आहे. तसेच कारखान्याने ४ कोटी ७८ लाख ८० हजार ६०० युनिट वीज निर्मिती केली असुन २ कोटी ८२ लाख ५८ हजार ६०५ युनिट वीज निर्यात केली आहे. तसेच कारखान्याने डिस्टीलरी प्रकल्पामधून १ कोटी लिटर इथेनॉल उत्पादन केले आहे.

मांजरा परिवाराचे मार्गदर्शक सहकार महर्षी दिलीपरावजी देशमुख, कारखान्याचे संस्थापक आमदार अमित विलासराव देशमुख, लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे चेअरमन धिरज विलासराव देशमुख आणि कारखान्याच्या चेअरमन वैशाली विलासराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करून प्रति मे. टन १०० रुपये प्रमाणे दुसरा हप्ता देण्याचा निर्णय घेतला आहे.

माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या नेतृत्वाखाली कारखाना यशस्वी वाटचाल करीत असून, शेतकरी हिताची परंपरा कायम ठेवत दुसरा हप्ता वर्ग करण्यात आल्याने सभासद व ऊस उत्पादक शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

यशस्वी गळीत हंगाम आणि विक्रमी उत्पादनाबद्दल कारखान्याच्या चेअरमन वैशाली विलासराव देशमुख, व्हा. चेअरमन वैजनाथराव शिंदे तसेच संचालक मंडळाने सर्व सभासद, ऊस उत्पादक शेतकरी, अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले आहे.

## मुलानं वृद्ध आई वडिलाला काढलं घराबाहेर : जिल्हाधिकाऱ्यांनी १५ दिवसात घर खाली करण्याचे मुलाला दिले आदेश

**गोंदिया/प्रतिनिधी :** शहरातील एका मुलानं आपल्या वृद्ध आई-वडिलांना मानसिक व शारीरिक त्रास देत घरातून बाहेर काढल्यानं मोठी खळबळ उडाली. ही धक्कादायक घटना गोंदिया शहरातील गौतम नगर इथली असून त्या वृद्ध आई-वडिलानं याची तक्रार गोंदिया शहर पोलिसात केली. या तक्रारी वरून मुलाविरोधात गोंदियाचे जिल्हाधिकारी तथा वरिष्ठ नागरिक अपील प्राधिकरण यांनी महत्त्वपूर्ण निर्णय देत संबंधित मुलाला १५ दिवसात घर खाली करण्याचे आदेश दिले आहेत. ज्येष्ठ नागरिकांच्या संरक्षणाच्या दृष्टीनं हा निर्णय म हत्त्वपूर्ण मानला जात आहे. मुलानं आई वडिलाला काढलं घराबाहेर : गौतमनगर बाजपेयी वॉर्ड येथील कौशल्या हरिराम मंदारकर (वय ७९) व हरिराम धाडू मंदारकर (वय ८६) हे स्वमालकीच्या घरात राहत होते. संबंधित घर हे कौशल्या मंदारकर यांच्या नावावर आहे. वृद्धापकाळात शांततेनं जीवन जगण्याची अपेक्षा असताना त्यांचाच मुलगा दिनेश मंदारकर हा वारंवार मालमत्तेच्या कारणावरून त्यांच्याशी वाद घालत होता. शिवीगाळ, धमक्या देत होता. सततच्या भांडणांमुळे वृद्ध दाम्पत्याचं जीवन असह्य झालं. मोठ्या भावासोबत झालेल्या वादानंतर त्यानं संतापाच्या भरात वृद्ध आई-वडिलांना चक्क घराबाहेर काढत त्यांच्या वस्तूही घराबाहेर फेकून दिल्या. त्यामुळे वृद्ध दाम्पत्याला दुसरीकडे आश्रय घ्यावा लागला. आई वडिलानं गाठलं पोलीस ठाणं : याप्रकरणी हरिराम मंदारकर यांनी मुलानं घराबाहेर काढल्याप्रकरणी गोंदिया शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानंतर ज्येष्ठ नागरिक कायद्यांतर्गत न्यायासाठी अर्ज करण्यात आला. जिल्हाधिकाऱ्यांनी सुनावणीदरम्यान घर हे वृद्ध दाम्पत्याच्या स्वमालकीचं असल्याचं स्पष्ट करत मुलाला त्यांच्या इच्छेविरुद्ध घरात राहण्याचा कोणताही कायदेशीर अधिकार नसल्याचं म्हटलं. ज्येष्ठ नागरिकांना स्वत:च्या घरात सन्मानानं व सुरक्षितपणे राहण्याचा पूर्ण अधिकार आहेत. त्यामुळे मुलाला १५ दिवसात घर खाली करण्याचे आदेश जिल्हाधिकारी मंगेश गोंदावले यांनी दिले आहेत.

## भारतीय क्रिकेटवर शोककळा, ३९ वर्षीय भारताच्या क्रिकेटपटूचं सामना खेळतानाच आकस्मिक निधन

**मुंबई/प्रतिनिधी :** भारतीय क्रिकेटसाठी फारच धक्कादायक बातमी समोर आली आहे. क्रिकेट खेळत असताना हृदयविकाराच्या झटक्याने खेळाडूचं निधन झालं. बंगळूरु येथे स्थानिक विभागीय क्रिकेट साम न्यादरम्यान हृदयविकाराचा झटका आल्याने कर्नाटकचे माजी रणजी क्रिकेटपटू एस. एल. अक्षय यांचे निधन झाल्याचे वृत्त आहे. शिवमोग्गा येथील रहिवासी असलेले ३९ वर्षीय अक्षय यांनी यापूर्वी रणजी ट्रॉफीम ध्ये कर्नाटकचे प्रतिनिधित्व केलं होतं आणि ते कर्नाटक प्रीमियर लीगमध्येही खेळले होते, जी आता महाराजा ट्रॉफी केएससीए टी-२० म्हणून ओळखली जाते.

घटना घडली तेव्हा अक्षय हे केएससीए तिसऱ्या विभागातील सामन्यात सॅफायर सीसीकडून खेळत होते. त्यांनी चार षटके टाकल्यानंतर अस्वस्थ वाटत असल्याची तक्रार केली. त्यानंतर त्यांना तातडीने जवळच्या रुग्णालयात नेण्यात आलं. मात्र, डॉक्टरांच्या प्रयत्नांनंतरही त्यांना मृत घोषित करण्यात आलं. एस. एल. अक्षय हे २०१४-१५ रणजी ट्रॉफी विजेत्या कर्नाटक संघाचा भाग होते.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.